ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

| | | |
|---|---|---|
| पुस्तकाचे नाव | : | पश्चिम खानदेश व त्याचे सचित्र वर्णन |
| लेखक | : | वासुदेव शिवराम तोरो |
| प्रकाशक | : | ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई |
| प्रकाशन वर्ष | : | १९२३ |
| मूळ ग्रंथ प्रत | : | शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे |

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प
अंकेक्षण रूपांतर - २०२०-२१

# पश्चिम खानदेश व त्याचे सचित्र वर्णन

वा. शि. तोरो

# WEST KHANDESH: VIEWS AND REVIEWS

V. S. TORO

954.4
Tor
9584

D.V.POTDAR LIBRARY
S P COLLEGE
D00967

IVERSITY PRESS
ALCUTTA MADRAS
1923

VISUAL INSTRUCTION SERIES

No. 1

# VIEWS AND REVIEWS OF WEST KHANDESH

BY

VASUDEO SHIVARAM TORO, B. A.

*Deputy Educational Inspector for Visual Instruction, Bombay Presidency*

OXFORD UNIVERSITY PRESS
LONDON BOMBAY CALCUTTA MADRAS

1923

Printed by V. P. Pendherkar at the Tutorial Press, 211a, Girgaon Back Road, Bombay,
and
Published by Humphrey Milford, at the Oxford University Press, 17-19, Elphinstone Circle, Fort, Bombay.

चित्र–दर्शन–शिक्षण माला.

पुस्तक पहिलें

# पश्चिम खानदेश जिल्ह्याचें सचित्र वर्णन

हें पुस्तक

**वासुदेव शिवराम तोरो, बी. ए.**

डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर फॉर व्हिजुअल इन्स्ट्रक्शन बॉम्बे प्रेसिडेन्सी ( मुंबई इलाखा )

यांनीं तयार केलें तें

**मॅनेजर, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई**

यांनीं प्रसिद्ध केलें

इ० स० १९२३

954.4
T04

# प्रस्तावना.

सरकारी नौकरी निमित्त पश्चिम खानदेश जिल्ह्यांत सुमारें चार वर्षें आम्हांस रहावें लागलें व सदर मुदतींत जिल्ह्याच्या बहुतेक सर्व भागांतून सरकारी कामासंबंधानें पुष्कळ वेळां प्रवास करावा लागला. नित्य कर्तव्यकर्म आटोपून राहिलेल्या फुरसतीच्या वेळांत करमणुकीचें साधन म्हणून व प्राथमिक शाळांतील एकाद्या विषयाचें शिक्षण अधिक सुलभ व मनोरंजक करतां येईल तर शक्य तो थोडासा प्रयत्न करावा या हेतूनें, जिल्ह्यांतील पौराणिक, ऐतिहासिक, भौगोलिक व सृष्टिसौंदर्य विषयक प्रेक्षणीय स्थळांचीं छायाचित्रें घेतलीं. सदर चित्रांचा शिक्षणाच्या कामीं प्रत्यक्ष उपयोग व्हावा म्हणून त्यांच्या "लँटर्न स्लाइड्स" व "स्टिरिओग्राफ्स" तयार केले; परंतु ह्या साधनांच्या अति महर्गतेमुळें या सचित्र शिक्षण पद्धतीचा सर्वत्र प्रसार होणें कठीण म्हणून हें पुस्तक मुद्दाम तयार केलें आहे. या पुस्तकाच्या सहाय्यानें पश्चिम खानदेश जिल्ह्याची सर्व माहिती– शाळेंतील मुलांस, शिक्षकांस व विशेषत: सामान्य साक्षर जनतेस चांगली होईल अशी आशा आहे. सदर पुस्तकास चांगला लोकाश्रय मिळाल्यास अशाच प्रकारचीं सचित्र वर्णनात्मक अनेक पुस्तकें प्रसिद्ध करून सार्वजनिक शिक्षणास बरीच मदत करितां येईल. हें पुस्तक तयार करण्याच्या, छापण्याच्या व प्रकाशनाच्या कामीं अनुक्रमें धुळें येथील माजी नार्मल क्लासचे अध्यापक रा. दामोदर वामन भाभे, मुंबई येथील टाटा पब्लिसिटी ब्यूरो व आक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे म्यानेजर यांची अतिशय मदत झाली याबद्दल त्या सर्वांचा पुस्तककर्ता फार आभारी आहे.


9584.
954.41 T08
7/2/94

# उपोद्घात.

अनेक लोकांनीं सुरक्षितपणें एकत्र राहण्यासाठीं केलेल्या ठिकाणास गांव म्हणतात. राज्यव्यवस्थेच्या सोईसाठीं पुष्कळ गांवांचा तालुका व अनेक तालुक्यांचा जिल्हा करितात. अशा रीतीनें आठ तालुक्यांचा बनलेला पश्चिम खानदेश जिल्हा आहे. ह्या पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील प्रदेशाचें स्वरूप, हवामान, पाऊसपाणी, सुपीकता, उत्पन्न, उद्योगधंदे, व्यापार, सामान्य लोकस्थिति व इतिहास यांची आपणास माहिती मिळवावयाची आहे. एकाद्या अज्ञात प्रदेशाचें ज्ञान करून घेण्याचें उत्तम साधन म्हणजे प्रथमतः त्या प्रदेशाचें स्वाभाविक स्वरूप पाहणें हें होय. प्रदेशाच्या स्वाभाविक स्वरूपाचे विशेष प्रकार लक्षांत ठेवून त्यांची इतरांशीं तुलना करून त्यावरून पूर्व अनुभवानें त्या प्रदेशाचे गुणधर्म ठरवितात. हे गुणधर्म म्हणजे प्रदेशाच्या स्वाभाविक रचनेवर अवलंबून असणारें प्रदेशाचें हवामान व पावसाचें मान हीं होत. प्रदेशाचें स्वरूप, हवामान व पावसाचें मान यांवरून त्या प्रदेशांतील सुपीकता, पिकें, उत्पन्न आणि त्यावर अवलंबून असणारे उद्योगधंदे व व्यापार यांचा, नंतर कार्यकारण भावानें, विचार करतात. वर सांगितलेल्या सर्व गोष्टींवरून प्रदेशांतील लोकवस्ती, लोकस्थिति, लोकांचा स्वभाव, त्यांचे पराक्रम व कार्यें म्हणजे इतिहास यांचें स्वरूप ठरवितात. वर सांगितलेल्या क्रमानेंच पश्चिम खानदेश जिल्ह्याची माहिती मिळविण्याकरितां प्रथमतः आपण त्या जिल्ह्याचें भूपृष्ठस्वरूप पाहूं.

# भूपृष्ठस्वरूप.


पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या स्वाभाविक स्वरूपाचा अथवा भूपृष्ठरचनेचा हा नकाशा आहे. नकाशांत उत्तर, पश्चिम व दक्षिण ह्या दिशांस डोंगरांच्या उंच रांगा असून, पूर्वेकडेही डोंगर दिसतात. उत्तरे कडील डोंगरांच्या रांगा ह्या सातपुडा पर्वताच्या ओळी असून त्यांवरील आस्तंभा व इतर उंच शिखरें उत्तरेस दिसत आहेत. नकाशाच्या ईशान्य कोपऱ्यासही बावाकुवरादि सातपुडा पर्वतांतील उंच शिखरें दिसत आहेत. पश्चिमे-कडील व दक्षिणेकडील डोंगरांच्या रांगा हे सह्यपर्वताच्या उत्तर टोंकापासून पूर्वेकडे येणारे तुटक फांटे आहेत. त्यावरील भामेर, सोनगीर व लळिंग हे उंच भाग नकाशांत दक्षिणेकडे दिसत आहेत. सह्य व सातपुडा या दोन पर्वतांच्या रांगांमध्यें पश्चिम खानदेश जिल्हा हें एक मोठें खोरेंच होय. उत्तर व दक्षिण भाग हे उंच असून मध्यभाग खोलगट आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडेही प्रदेश सखल होत गेला आहे. एकंदर प्रदेशाचा उतार साधारण मानानें उत्तरेकडून दक्षिणेकडे व दक्षिणेकडून उत्तरेकडे व मुख्यत: नैऋत्येकडून ईशान्येकडे आहे, असें नद्यांच्या प्रवाहांच्या वळणांवरून दिसून येईल. तापी कांठच्या प्रदेशाला मात्र पूर्वपश्चिम उतार असल्यामुळें तापी पश्चिम वाहिनी झाली आहे. उत्तरेकडील तळोदें तालुक्याचा बहुतेक भाग डोंगरांनीं व्यापलेला असून, शिरपूर तालु-क्याचाही बराच भाग डोंगराळ आहे. शिंदखेडें तालुका सर्वांत सपाटीचा असून, शहादें तालुक्यांत डोंगर कमी आहेत. साकरी व नवापूर तालुक्याचा पश्चिमेकडील भाग व धुळें तालुक्याचा दक्षिणेकडील भागही डोंगराळ आहे. प्रदेशाचे उंच सखल भाग व उतार पाहिल्यावर आतां नद्यांसंबंधीं विचार करूं.




नं० १:—भूपृष्ठाचा नकाशा.

# नद्या.


पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील नद्यांचा हा नकाशा आहे. ह्या नद्यांत तापी ही सर्वांत मोठी व मुख्य नदी होय. उत्तरेस सातपुड्याची उतरण व दक्षिणेस सह्याद्रीची उतरण यांच्या मधील खोऱ्यांतून ही नदी या जिल्ह्यांत ८५ मैल पूर्वपश्चिम वहात गेली आहे. हिच्या कांठावरील दरडी उंच असल्यामुळें या नदीचे पाट काढून शेतीकडे उपयोग करतां येत नाहीं. तापीस उत्तरेकडून अणेर, अरुणावती, गोमई, गोमती व वालेर आणि दक्षिणेकडून बोरी, पांझरा, बुराई, अमरावती, शिवा, रंगावळ व नेसू या नद्या मिळतात. उत्तरेकडील अति जास्त उतारामुळें त्याबाजूनें मिळणाऱ्या नद्या अरुंद, कमी लांबीच्या, जोरानें वहाणाऱ्या व अल्प जलसंचयाच्या अशा आहेत; परंतु दक्षिणेकडील कमी उतारामुळें त्या बाजूनें मिळणाऱ्या नद्या रुंद, संथ वहाणाऱ्या, पुष्कळ जलसंचय असणाऱ्या व बऱ्याच लांब वहाणाऱ्याही आहेत. जिल्ह्याच्या वायव्य हद्दीवरून वहाणारी नर्मदा नदी होय. हिंदू लोक हिला फार पवित्र मानतात. जिल्ह्याच्या दक्षिण भागांतील मोठी नदी पांझरा ही होय. हिचा प्रवाह ८० मैल लांब आहे. ही ह्या जिल्ह्याचे पश्चिम सरहद्दीवरील सह्य पर्वतांतून निघून साकरी व धुळें या तालुक्यांतून वहात जाऊन शिंदखेडें तालुक्यांत मुडावद गांवाजवळ तापीस मिळाली आहे. ही नदी बहुतेक सपाट प्रदेशांतून वहात असल्यामुळें या नदीला बरेच बंधारे बांधून पाट काढून पाणी शेतांत नेलें आहे. या जिल्ह्यांतील विशेष उपयोगी व महत्त्वाची हीच नदी असल्यामुळें या नदी विषयीं विशेष माहिती पुढें दिली आहे.


नद्या.
नर्मदा नदी
तळोदें
तापी
शहादें
शिरपुर
नंदुरबार
सिंदखेड
बुराई न.
पिंपळनेर
पांझरा नदी
धुळें
बोरी नदी

नं० २:—नद्यांचा नकाशा.

# पांझरा नदीच्या उगमा जवळील देखावा.

साकरी तालुक्याच्या अगदीं पश्चिम सरहद्दीवर वारसें गांवाजवळ पांझरा नदी उगम पावते. या नदीच्या उगमाजवळचा देखावा या चित्रांत दाखविला आहे. या देखाव्यावरून डोंगर, झाडी, व नदी यांच्या स्वाभाविक सौंदर्याची कल्पना सहज होईल. अशीं सृष्टिसौंदर्याचीं ठिकाणें या जिल्ह्यांतील सातपुडा व सह्य ह्या पर्वतांत बरींच आहेत. सह्य पर्वताच्या उत्तर टोंकापासून पूर्वेकडे पसरलेले जे अनेक तुटक फांटे आहेत, त्यांपैकींच एक फांटा चित्रांतील अगदीं मागच्या बाजूस दिसत असून त्यावरील मांग्यातुंग्या नांवाचीं उंच शिखरेंही अस्पष्ट दिसत आहेत. डोंगरांत गर्द झाडी असून, त्या झाडींतूनच नदीप्रवाह सुरू झाल्याचें दिसतें. नदीच्या पात्रांत बरेच मोठमोठे खडक पडलेले आहेत. अशा खडकाळ प्रदेशांतून ही नदी वहात असल्यामुळें पाणी पांढरें दिसत असून प्रवाहाला जोरही बराच आहे. उगमाजवळ नदीचें पात्र अरुंद असून पुढें कसकसें रुंद होत जातें, हेंहीं या चित्रावरून दिसून येईल. पुढें या नदीला नाले, ओढे मिळून हिच्या पात्रांत पाणी पुष्कळ झाल्यामुळें व साधारण सपाट प्रदेशांतूनच ही नदी पुढें वहात असल्यानें, नदीच्या पात्रांत बंधारे बांधून व नदीचे पाट काढून तिच्या पाण्याचा शेतीकडे उपयोग केला आहे. उगमापासून संगमापर्यंत या नदीला एकंदर साठ बंधारे आहेत असें म्हणतात. नदीच्या पात्रांतील पाणी अडविण्याकरितां बांधलेला बंधारा कसा असतो हें आतां आपण पाहूं.



नं० ३:—पांझरा नदीच्या उगमाजवळील देखावा.

# पानखेड जवळील पांझरेचा बंधारा.


साकरी तालुक्यांत पिंपळनेरच्या पश्चिमेस पांच सहा मैलांवर पानखेड गांवाजवळ पांझरा नदीचा पहिला बंधारा आहे. ह्या बंधाऱ्याचाच देखावा या चित्रांत दाखविला आहे. चित्राच्या मध्यभागीं बंधारा दिसत आहे. नदीच्या पात्रांतील पाणी या बंधाऱ्यामुळें अडविलें जातें व केव्हां केव्हां पाणी पात्रांत मावेनासें झाल्यावर तें बंधाऱ्यावरून एकाद्या लहानशा धबधब्याप्रमाणें खालीं पडूं लागतें. बंधाऱ्यावरून खालीं पडत असलेलें पाणी चित्रांत दिसत आहे. नदीच्या पात्रांत खडकही पुष्कळ असून बंधाऱ्याच्या मागच्या बाजूचा प्रदेश बराच उंच आहे. नदीच्या कांठावर असलेल्या वृक्षांचें प्रतिबिंबही खालीं पाण्यांत पडलेलें दिसत आहे. बंधाऱ्याच्या योगानें नदीचें पाणी अडविल्यानंतर तें पाटानें शेतांत नेऊन त्याचा बागाइतीस उपयोग करितात. अशा अनेक बंधाऱ्या-मुळेंच पांझरा नदीच्या कांठच्या प्रदेशांत बागाइती उत्पन्न बरेंच केलें जातें. पांझरा व तिला मिळणारी कान, ह्या दोन नद्या सपाट प्रदेशांतूनच वहातात म्हणूनच यांचे पाट काढून शेतीच्या कामास उपयोग करून घेतां आला. शेतीच्या कामास खरोखरी उपयोगी पडणाऱ्या अशा या जिल्ह्यांतील ह्या दोन नद्या आहेत. या नदीच्या पाटाच्या पाण्याचा उपयोग साकरी व धुळें या दोन तालुक्यांतील कांहीं जमिनीस झाला आहे. पाटाच्या पाण्यामुळें व बागायती उत्पन्नामुळें या नदीच्या कांठच्या प्रदेशाची हवा साधारणपणें थंड झाली आहे; परंतु प्रदेशांतील हवामान सामान्यपणें ज्या कारणांवर अवलंबून असतें त्यांचा आतां विचार करूं.



नं० ४ :—पांझरेचा बंधारा.

# हवामान.


पश्चिम खानदेश जिल्ह्याचें हवामान दाखविणारा हा नकाशा आहे. प्रदेशाचें हवामान तेथील भूपृष्ठावर म्हणजे प्रदेशाच्या स्वाभाविक रचनेवर पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. जिल्ह्याच्या भूपृष्ठाच्या नकाशांत उत्तर, पश्चिम व दक्षिण भाग उंच आहेत व पूर्व भाग साधारण सपाट आहे. पूर्वेकडील प्रदेश खोलगट असल्यामुळें तेथील जमीन फार तापते, म्हणून त्या भागाची हवा फार उष्ण आहे. जिल्ह्याच्या मध्य भागांत बरेच उंच प्रदेश असून डोंगरावर झाडीही असल्यामुळें त्या प्रदेशांतील हवा पूर्वेकडील प्रदेशापेक्षां कमी उष्ण आहे. उत्तर, पश्चिम व दक्षिण या भागांत सातपुडा व सह्य पर्वताचे उंच फांटे असून जंगलही बरेंच आहे, त्यामुळें त्या भागांतील हवा थंड आहे. या प्रमाणें ह्या जिल्ह्याचे हवामानाच्या दृष्टीनें पूर्व, मध्य, पश्चिम असे तीन भाग होतात. पूर्व भागांत बहुतेक सपाटीचा प्रदेश, मध्यभागांत साधारण उंचवट्याचा प्रदेश व पश्चिम भागांत अति उंच डोंगराळ मुलूख येतो. म्हणून शिरपूर व शिंदखेडें या तालुक्यांतील हवा फार उष्ण; शहादें, नंदुरबार व धुळें या तालुक्यांतील हवा साधारण उष्ण; आणि तळोदें, नवापूर व साकरी या तालुक्यांतील हवा बरीच थंड आहे. पूर्व भागांत उष्णतेचें मान सरासरीनें ११५ अंशांपर्यंत, मध्यभागांत १०५ अंशांपर्यंत व पश्चिम भागांत ९५ अंशांपर्यंत जातें. भूपृष्ठाचा व हवामानाचा पावसाशीं बराच संबंध असतो म्हणून आतां जिल्ह्यांतील पावसाच्या मानाचा विचार करूं.




नं० ५ :—हवामानाचा नकाशा.

# पर्जन्यमान.


पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील पावसाच्या मानाचा हा नकाशा आहे. जिल्ह्याची स्वाभाविक रचना व हवामान यांवर पावसाचें मान पुष्कळ अंशीं अवलंबून असतें. सपाट व उष्ण प्रदेशांत पाऊस कमी, उंचवट्याच्या व मध्यम उष्णतेच्या प्रदेशांत पाऊस मध्यम आणि अति उंच, व थंड हवेच्या ठिकाणीं पाऊस पुष्कळ पडतो; म्हणून पावसाच्या दृष्टीनें या प्रदेशाचे तीन निरनिराळे भाग होतात. पूर्व बाजूच्या खोऱ्यांत डोंगर व झाडी कमी आणि हवा उष्ण असल्यामुळें पाऊस कमी पडतो. मध्य भागांत प्रदेश साधारण उंच व झाडीचा असल्यानें त्या भागांत पाऊस बराच पडतो. उत्तर व पश्चिम भागांत उंच डोंगर, दाट झाडी, व थंड हवा असल्यामुळें त्या भागांत पाऊस पुष्कळ पडतो. या जिल्ह्यांत पूर्वेकडून पश्चिमेकडे जों जों जावें, तों तों पावसाचें मान वाढत जातें. पूर्व भागांत सरासरीनें १५ ते २० इंच पाऊस पडतो. मध्यभागांत २० ते २५ इंच व पश्चिम भागांत २५ ते ३० इंच पाऊस पडतो. हेंच तालुकावार पाहिलें तर शिंदखेडें व शिरपूर तालुक्यांत पाऊस कमी पडतो. धुळें, नंदुरबार व शहादें या तालुक्यांत मध्यम आणि साकरी, नवापूर व तळोदें या तालुक्यांत पाऊस जास्त पडतो. पावसाचें पाणी, कालवे व तलाव यांवर जमिनीची सुपीकता बरीच अवलंबून असते. साकरी, धुळें व शहादें तालुक्यांत नदीला कालवे काढले आहेत आणि धुळें तालुक्यांत नकाणें व गोंदूर या ठिकाणीं तलाव आहेत; ह्यावरून जिल्ह्यांतील जमिनीची सुपीकता कोठें कशी आहे याचा आतां विचार करूं.




नं० ६ :—पर्जन्यमानाचा नकाशा.

# सुपीकता.

ह्या नकाशांत पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील सुपीक जमिनीचे मुख्य प्रकार दाखविले आहेत. जमिनीची सुपीकता साधारणपणें जमिनींतील द्रव्यें व हवापाणी यांवर अवलंबून असते. अगदीं उत्तरेकडील व दक्षिणेकडील डोंगराळ प्रदेश नकाशांत पांढऱ्या रंगानें दाखविला आहे. पांझरा व तापी या दोन नद्यांच्या खोऱ्यांतील सखल प्रदेश काळसर रंगानें दाखविला आहे व तापी कांठचा अतिशय खोलगट भाग काळ्या रंगानें दाखविला आहे. दक्षिण व उत्तर भागांत डोंगराळ बरड जमीन असून मध्य पट्ट्याला मध्यम काळी व तापीच्या दोन्हीं थडींस उत्तम काळी म्हणजे रायचिकण जमीन आहे. उत्तरेकडील प्रदेशांत पाऊस जरी बराच पडतो, तरी तो प्रदेश डोंगराळ व अति उतरता असल्यामुळें पावसाचें पाणी सर्व वाहून जातें, त्यामुळें पावसाचा त्या प्रदेशांतील जमिनीस फारसा उपयोग होत नाहीं; परंतु मध्य पट्ट्यांतील खोलगट प्रदेशांत पावसाचें पाणी जमिनींत मुरतें. तापी कांठच्या दोन्हीं बाजूंस पावसाळ्यांत नदीच्या पाण्याबरोबर वहात येणाऱ्या गाळानें जमीन अतिशय मऊ भुसभुशीत व सुपीक झाली आहे. येथें जमिनींत खालीं पंधरावीस फूटपर्यंत दगड मुळींच लागत नाहीं. शहादें, साकरी व धुळें या तालुक्यांतील बराच भाग नदीच्या व तलावाच्या पाटाच्या पाण्यामुळें सुपीक झाला आहे. बरड जमिनी कुळीथ, नागली, वरी वगैरे हलक्या पिकाच्या उपयोगी आहेत. मध्यम काळ्या जमिनींत कापूस, आणि बाजरी व तिळी वगैरे पिकें होतात. ह्या जिल्ह्याच्या निरानिराळ्या भागांत होणारीं मुख्य पिकें पुढें आपण पाहूं.




नं० ७:—सुपीकतेचा नकाशा.

# मुख्य पिकें.

पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील मुख्य पिकांचा हा नकाशा आहे. जिल्ह्यांतील पिकें तेथील जमिनीच्या स्वरूपावर व हवापाण्यावर अवलंबून असतात. या जिल्ह्याच्या पूर्वेकडील भागांत जमीन खोल व काळी, उष्णतामान अधीक व पाऊस बेताचा म्हणून तेथें कापूस व बाजरीचें पीक बरेंच येतें. मध्यभागाची तापी कांठची अतिशय सुपीक रायचिकण जमीन रब्बीच्या पिकास जास्त उपयोगी पडते व या जमिनींत गहूं, हरभरा हीं पिकें होतात. पश्चिमेकडील भागांत साकरी तालुक्यांतील तांबूस व बरड जमिनीला पांझरेच्या पाटाचा उपयोग होत असल्यामुळें ऊंस, भाजीपाला व इतर बागाइती उत्पन्न बरेंच होतें. जिल्ह्याच्या किंवा तालुक्याच्या भागांत ज्या पिकाचें क्षेत्र सर्वांत अधिक असेल, तेंच त्या भागाचें मुख्य पीक होय. या दृष्टीनें विचार केला असतां ह्या जिल्ह्यांतील मुख्य पीक कापूस होय. हेंच तालुकावार पाहिलें असतां धुळें, शिंदखेडें, व शिरपूर तालुक्यांत अनुक्रमें कापूस, बाजरी व तिळी; शहादें आणि नंदुरबार तालुक्यांत गहूं व हरभरा; साकरी, नवापूर आणि तळोदें तालुक्यांत ऊंस, साळ व एरंडी हीं अनुक्रमें मुख्य पिकें आहेत. पूर्वीं नवापूर, नंदुरबार व साकरी तालुक्याच्या पश्चिम भागांत भाताचें पीक बरेंच असे; परंतु अलीकडील पर्जन्याच्या कमतरतेमुळें हें पीक बुडाल्यासारखेंच झालें आहे. या जिल्ह्यांतील मुख्य पिकाचा म्हणजे कापसाच्या शेताचा देखावा आतां आपण पाहूं.




**नं० ८:—मुख्य पिकांचा नकाशा.**

# कपाशीचें शेत.


या चित्रांत पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील कपाशीच्या शेताचा देखावा दाखविला आहे. कापसाचीं झाडें व त्यांवरील उकललेलीं बोंडें चित्रांत दिसत असून कापूस वेंचण्याचें काम चाललें आहे, हेंही लक्षांत येईल. कापसाच्या पिकाकरितां प्रथम जमीन चांगली नांगरतात. पाऊस पडून जमिनीस ओल येऊन वाफ झाली म्हणजे पांभरीनें सरकी पेरतात. सुमारें ५-६ दिवसांनीं सरकीस कोंब फुटतात व एक महिन्यांत झाड तयार होतें. कापसाचा पेरा मृगाचे नक्षत्रांत होतो. मृगांत जर कापसाची पेरणी साधली नाहीं तर कापूस जोरदार येत नाहीं. नियमितवेळीं चार पाऊस पडले म्हणजे कापसाचें पीक चांगलें येतें. बेताचा पाऊस, उष्ण हवा व सुपीक काळी जमीन हीं तिन्हीं कारणें या जिल्ह्यास अनुकूल असल्यामुळें, या जिल्ह्यांत कापूस फार पिकतो. येथील कापसाची गणना मध्यम प्रकारांत होते, म्हणून कांहीं ठिकाणीं इजिप्त देशांतील बीं आणून लोक लागवड करूं लागले आहेत. कापसाचें झाड साधारणपणें तीन ते पांच फूट वाढतें. पेरणी झाल्यापासून चार महिन्यांनीं बोंडें फुटूं लागतात व नंतर १५ दिवसांनीं एकदां, अशी तीन वेळ वेंचणी करितात. चांगलें पीक आल्यास एका झाडापासून शेरभर कापूस निघतो. कापूस वेंचण्याचें काम बहुतकरून बायका व मुलें करितात. कापूस वेंचीत असलेल्या दोन बायका या चित्रांत दिसत आहेत. वेंचलेला कापूस जमा करून गाडींत भरून नंतर घरीं आणतात. कापसास भाव आला म्हणजे तो गिरणींत नेऊन विकतात. गिरणींतील पटांगणांत गाडींतील कापसाचे ढीग पडलेले आतां आपण पाहूं.



नं० ९ :—कपाशीचें शेत.

# कापसाची गाडी.

कापसाची वेंचणी झाल्यानंतर शेतकरी लोक कापूस गाडींत भरतात. प्रथम गाडींत एक मोठा झोऱ्या हांथरतात व त्यांत कापूस भरून त्यावर झोऱ्याचेंच झांकण घालतात. गाडींत सुमारें पांच सहा फूट उंच कापूस भरला जातो. त्याचें वजन सुमारें १५ मण असतें. अशा कपाशीच्या भरलेल्या गाड्या धुळें, नरढाणें, दोंडाईचें शिरपूर व नंदुरबार वगैरे मोठमोठ्या पेठांस विकावयास नेतात. कापसाची गाडी गिरणींत आल्यानंतर भाव ठरल्यावर कापसाचें माप करून नंतर गाडींतील कापूस, येथें चित्रांत दाखविल्याप्रमाणें, गिरणीच्या आवारांत नेऊन ओततात. कापसास जेव्हां चांगला भाव असतो, तेव्हां कापसाच्या एका गाडीची किंमत २५०--३०० रुपये येते. कित्येक शेतकरी लोक भाव चांगला येईपर्यंत कापूस शिल्लक ठेवितात व योग्य भाव आल्यावर विक्रीस काढितात. कापसाच्या भावावर कित्येक व्यापारी मोठमोठे सट्टे करून कित्येक वेळां सधन किंवा निर्धन होतात. या सट्टेबाजीचा प्रसार अलीकडे व्यापारी वर्गांत बराच झाला आहे. रालीब्रदर्स व बुशान वगैरे मोठमोठे परदेशी व्यापारी कित्येकवेळां कापसाचीं शेतें वेंचणीच्या पूर्वींच सट्ट्यानें विकत घेतात. थोड्या श्रमानें कापसाच्या पिकापासून पुष्कळ उत्पन्न होतें, यामुळें हल्लीं शेतकरी लोक कापसाचा पेरा जास्त करूं लागले आहेत. शेतांतील कापूस गिरणींत आल्यावर तो यंत्रांच्या सहाय्यानें पिंजून त्यांतील सरकी काढून पक्क्या कपाशीच्या बोंद्या गट्ठे बांधण्याकरितां प्रेसामध्यें नेतात. अशा प्रकारची कापूस पिंजण्याची गिरणी आपणास पाहावयाची आहे.




नं० १०:—कापसाच्या गाड्या.

# कापसाची गिरणी.

पश्चिम खानदेशांतील कापसाच्या गिरणीचें हें चित्र आहे. अशा गिरण्या धुळें, दोंडाईचें, शिरपूर, नरढाणें, नंदुरबार, सोनगीर, बेटावद व शिरूड या गांवीं आहेत. गिरणीच्या समोर पटांगणांत कापसाचे मोठमोठे ढीग पडलेले चित्रांत दिसत आहेत व त्या ढिगांतील कापूस मोठ्या डालग्यांत भरून गिरणींत नेत असलेले दोन इसम चित्राच्या दोन्हीं बाजूस आहेत. चित्राच्या मध्यभागीं कापसाच्या ढिगाजवळ कांहीं व्यापारी व गिरणी कामगार उभे आहेत. कापसाच्या ढिगामागें गिरणीची इमारत आहे. चित्राच्या डाव्या बाजूकडील इमारतींत एंजिन व बायलर असून, तेथील लोखंडी उंच धुराडेंही दिसत आहे. उजव्या बाजूकडील मोठ्या इमारतींत कापूस पिंजण्याच्या अनेक चाल्या असून त्यांवर स्त्रिया काम करीत असतात. कापूस गिरणींत गेल्यावर चाल्यांवर पिंजून, सरकी काढून, रूच्या बोंद्या बांधितात व नंतर बोंद्या प्रेसामध्यें नेऊन गांठी तयार करितात. प्रत्येक गांठीचें वजन सुमारें पक्के दोनशें शेर असतें. एका दिवसांत सुमारें शंभर गांठी प्रेसमध्यें बांधिल्या जातात. या प्रेसच्या कारखान्यास सुमारें दोनशें माणसें लागतात. गांठी तयार झाल्यावर त्या आगगाडींतून मुंबईकडे रवाना होतात. जी. आय. पी. व तापी व्हॅली रेलवे सुरू झाल्यामुळें दळणवळणास व व्यापारास फार मदत झाली व त्या योगानें कापूस पिंजण्याच्या व गठ्ठे बांधण्याच्या पुष्कळ गिरण्या या जिल्ह्यांत झाल्या आहेत. गिरणींत कापूस पिंजून निघालेल्या सरक्यांचा देखावा आतां आपण पाहूं.


“ मातृपितृचरणार्पणमस्तु ”



नं० ११ :—कापसाची गिरणी.

# सरकी.

शेतांतील कापूस वेंचून झाल्यावर, तो गाडींत भरून शेतकरी लोक विक्रीकरितां गिरणींत नेतात. विकत घेतलेला कापूस नंतर चात्यांवर घालून, त्यांतील सरकी यंत्राच्या सहाय्यानें काढिली जाते व अशा सरकींचे मोठमोठे ढीग गिरणीच्या पटांगणांत पडलेले असतात. या चित्रांत सरकीच्या ढिगांचा देखावा दाखविला आहे. चित्राच्या मध्यभागीं सरकी वजन करण्याचा कांटा असून, वजन केलेली सरकी पाटींत भरून नेत असलेले स्त्रीपुरुष चित्राच्या दोहोंबाजूस दिसत आहेत. कांट्याजवळ सरकी वजन करणारा मनुष्य व खरेदीकरितां आलेले व्यापारी उभे आहेत. कांट्याच्या मागील बाजूस डोंगराप्रमाणें पडलेले सरकीचे ढीग दिसत आहेत. सरकीचा उपयोग मुख्यतः दोन प्रकारें होतो. एक जमिनींत बीं पेरण्याकरितां व दुसरा जनावरांस खाण्याकरितां. गरीब लोक अलीकडे सरकीचें तेल काढून त्याचा तुपासारखा तळण्याकडे उपयोग करूं लागले आहेत. कपाशींचें थंड तेल डोक्यासही लावतात. कापसाचें पीक पश्चिम खानदेशांत पुष्कळ होत असल्यामुळें सरकीचा पुरवठा फार होतो. मारवाडी लोक व लोण्याचे व्यापारी हजारों खंडी सरकी हंगामाच्या दिवसांत विकत घेऊन ती वखारींत भरून ठेवितात व पावसाळ्यांत गवळी लोकांस कडक भावानें विकून बराच पैसा कमावितात. ह्या जिल्ह्यांतून पुष्कळ सरकी पोत्यांत भरून परप्रांतीं रेलवेमार्गानें रवाना होते. ह्या जिल्ह्यांतील गाईम्हशींस सरकी पुष्कळ खावयास मिळते, त्यामुळें या जिल्ह्यांत दुभतीं जनावरें उत्तम असून त्यांचें दूधही सकस निघतें. ह्या जिल्ह्यांतील दुभतीं व शेतकीचीं जनावरें आतां आपण पाहूं.



नं० १२:—सरकी.

# दुभतीं व इतर जनावरें.

ह्या जिल्ह्यांतील दुभतीं व शेतकीचीं जनावरें या चित्रांत दाखविलीं आहेत. यांत गाई, म्हशी व बैल पुष्कळ आहेत. हीं जनावरें सशक्त व सुबक दिसतात. शेतकऱ्यांचें सर्व जीवन यांवर अवलंबून असल्यामुळें या जनावरांची निगा ते लोक चांगली राखितात. शेतकरी सकाळीं लवकर उठतो, गोठ्याची साफसूफ करितो, धार काढून प्रहर दिवसास गुरें चरावयास बाहेर सोडितो. गांवाच्या बाहेर चरावयास सोडलेल्या गुरांचा देखावा या चित्रांत दाखविला आहे. गुरें दोन तीन तास चरल्यानंतर पाणी पिऊन झाडाखालीं विश्रांति घेतात व पुन्हां दोन तीन तास चरून सायंकाळीं घरीं येतात. यामुळें गुरें सशक्त व निरोगी असतात. या जिल्ह्यांत जमीन मुबलक असून त्यांत बरीच जमीन पडीत आहे. सातपुडा व सह्यपर्वतांत जंगलही फार आहे. यामुळें चारा पुष्कळ होतो. या जिल्ह्यांतील जंगलांच्या कित्येक भागांत पाण्याचा पुरवठाहि चांगला होतो. अशा प्रकारें चारा व पाणी भरपूर असल्यामुळें गुरांची पैदास या जिल्ह्यांत चांगली होते. शिवाय या जिल्ह्यांत जनावरांस सरकी भरपूर खावयास मिळते. त्यामुळें गुरें चांगल्या स्थितींत असून त्यांचें दूध पुष्कळ व सकस निघतें आणि त्यापासून उत्तम लोणीही तयार होतें. म्हणूनच फार दिवसांपासून हा जिल्हा लोण्याकरितां प्रसिद्ध आहे. लोण्याच्या बाजाराचा देखावा आतां आपण पाहूं.



नं० १३:—दुभतीं व इतर जनावरें.

# लोण्याचा बाजार.


या जिल्ह्यांत कापसाचें पीक फार होत असल्यामुळें सरकी पुष्कळ निघते व ती गाईम्हशींना भरपूर खावयास मिळते, त्यामुळें त्यांचें दूध सकस निघतें. या जिल्ह्यांतील बहुतेक शेतकऱ्यांचे घरीं दुभतीं जनावरें असतात. त्यांचें दूध काढून त्यापासून लोणी तयार करून तें विकावयास नेतात. चारा व सरकी पुष्कळ असल्यामुळें म्हशी पाळून लोण्याचाच धंदा करणारे पुष्कळ गवळी या जिल्ह्यांत आहेत; म्हणून लोण्याच्या व्यापाराच्या बऱ्याच पेठा या जिल्ह्यांत धुळें, शिरूड, शहादें वगैरे ठिकाणीं आहेत. धुळें तालुक्यांतील शिरूड येथील लोण्याच्या बाजाराचा देखावा येथें चित्रांत दाखविला आहे. चित्राच्या मध्यभागीं लोण्यानें भरलेल्या अनेक करंड्या असून त्यांजवळच तागडींतून लोणी वजन करण्याचें काम चाललेलें दिसत आहे. वजन केलेला लोण्याचा गोळाही एका मनुष्यानें हातांत धरलेला चित्रांत दिसत आहे. करंड्याच्या मागील बाजूस लोण्याचे मुख्य व्यापारी बसलेले आहेत. या व्यापाऱ्यांस लोण्याचा पुरवठा करणारे अनेक गवळी लोक व्यापाऱ्यांचे मागील बाजूस उभे राहिले आहेत. व्यापारी लोक वर्षांतून एकदां दसऱ्याचे दिवशीं लोण्याचा भाव गवळी लोकांबरोबर ठरवितात व तो भाव पुढील दसऱ्यापर्यंत चालतो. भाव ठरविल्यावर व्यापारी लोक गवळ्यांस सरकीकरितां आगाऊ पैसे देतात व गवळी लोक प्रत्येक आठवड्यास ठरलेल्या दोन दिवशीं व्यापाऱ्यांस लोणी आणून देतात. व्यापारी लोक लोणी घेऊन वजन करून करंड्यांत बंद करून रेलवे पार्सलनें मुंबई, पुणें इत्यादि शहरीं रवाना करितात. कापसापासून होणारे इतर उद्योगधंदे आपण आतां पाहूं.



नं० १४:—लोण्याचा बाजार.

# विणकाम.


या जिल्ह्यांत शेती हा मुख्य धंदा असून कापूस हेंच मुख्य पीक असल्यामुळें कापसासंबंधानें अनेक उद्योगधंदे या जिल्ह्यांत चालतात. पूर्वीं कापूस पिंजण्याच्या गिरण्या नव्हत्या, तेव्हां हात रहाटावर कापूस पिंजून, सूत काढून त्यापासून झोन्ये, सुताडे, जाजमें, झुला व लुगडीं करण्याचे कारखाने या जिल्ह्यांत होते. आतां बाजारांत पेटीचें सूत विकत घेऊन त्यापासून लुगडीं, खण व रुमाल तयार करण्याचें काम मोमीन व इतर लोक पुष्कळ करितात. धुळें येथील पहिल्या गल्लींतील मोमीन लोकांचे कांड्या भरण्याचे रहाट व सूत भरण्याचे सांचे या चित्रांत दाखविले आहेत. कुटुंबांतील पुरुष विणण्याचें काम करितात व बायकामुलें कांड्या भरणें, ताणा लावणें वगैरे कामास मदत करितात. चित्राच्या मध्यभागीं एक मोमीन स्त्री रहाटावरून सूत कांडीवर भरीत आहे व चित्राच्या उजव्या बाजूस दुसरा रहाट दिसत आहे. रहाटाच्यामागें कांहीं लहान मुलें व मुली एक सारखे फिरत राहून सुताचा सांचा तयार करीत आहेत. कांड्या भरून सांचे तयार झाल्यावर हातमागावर लुगडीं विणतात. धुळें व देवपूर येथील मोमीन लोक रोज सुमारें तीनशें लुगडीं तयार करितात. मोमीन लोकांप्रमाणेंच ह्या जिल्ह्यांतील कित्येक साळी व कोष्टी बाजारांतील पेटीचें सूत विकत घेऊन लुगडीं, खाद्या, झुला तयार करितात. खाद्या रंगवून जाजमें तयार करण्याचें काम रंगारी लोक करितात. या रंगारी लोकांचें रंगाचें काम आपणास पाहावयाचें आहे.



नं० १५:—विणकाम.

# रंगाचें काम.


खादी रंगविण्याचें काम शिंदखेडें तालुक्यांत मालपूर गांवीं मोठ्या प्रमाणावर चालतें. गांवाच्या बाहेर नदीच्या पटांगणांत चाललेलें खादी धुण्याचें व रंगविण्याचें काम या चित्रांत दाखविलें आहे. चित्राच्या मागील बाजूस मालपूर येथील किल्ल्याचा देखावा दिसत आहे. चित्राच्या मध्यभागीं खादी पसरून त्यावर पाणी शिंपडण्याचें व खादीवर ठसे मारण्याचें काम चाललेलें दिसत आहे. प्रथम कोरी खादी नदींत धुऊन रेतींत वाळत घालून तिच्यावर पाणी शिंपडतात; नंतर रंगाच्या द्रव्याच्या मिश्रणांत खादी भिजवितात. दुसरे दिवशीं खादी सुकवून त्यावर ठसे मारण्याचें काम करितात. प्रथम काळा कांठ म्हणजे हिराकस, हिरडे व चिंचोके यांचें मिश्रण तयार करितात; नंतर पास नांवाचे, तुरटीचें व चिंचोक्याचें पीठ व गेरू यांचें मिश्रण तयार झाल्यावर, किनारीवर काळ्या रंगानें व आंतील बाजूस लाल रंगानें छापतात. छापून तयार झालेलीं खादीचीं ठाणें, नंतर नदींत धुवून रंगाच्या पाण्यांत उकळतात. जों जों खालीं जास्त जाळ लावावा, तों तों रंग चांगला बसतो असें म्हणतात. उकळल्यानंतर तीं रेतींत पसरून वाळवितात. पूर्वीं धावडीचीं फुलें आणि आलच्या मुळ्या यांचा रंगाच्या कामीं उपयोग करीत असत; परंतु अलीकडे परदेशी रंगाचाच उपयोग करतात. खादी रंगविण्याचा धंदा रंगाच्या महागाईमुळें दिवसें दिवस कमी होत चालला आहे. हा धंदा भावसार जातीचे रंगारी लोक करतात. हे लोक मूळचे गुजराथेंतील राहाणारे होत. खानदेशांत रंगाचें काम करण्याकरितां ते आले असें म्हणतात. नंदुरबार मालपूर व चिरणें या गांवीं यांची वस्ती बरीच आहे.



नं० १६:—रंगाचें काम.

# जंगली वनस्पती.


पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या उत्तरेकडे सातपुडा पर्वतांत आणि दक्षिण व पश्चिम बाजूंस सह्य पर्वतांत जंगल फार आहे, म्हणून या भागांत लांकडाचें उत्पन्न फार होतें. ह्या जिल्ह्यांतील मुख्य जंगली वनस्पतींचा हा नकाशा आहे. वनस्पतींची उत्पत्ति, जमिनीचें स्वरूप, हवा व पाणी यांवर अवलंबून असते. जस जसें आपण पूर्वेकडून पश्चिमेकडे जाऊं तसतसें या जिल्ह्यांत जमिनीचें स्वरूप, हवामान व पाऊस हीं बदलतात म्हणून निरनिराळ्या जंगली वनस्पती आपणांस दिसतात. धुळें व शिरपूर तालुक्यांच्या जंगलांत अंजनाचीं झाडें विशेष आढळतात. शहादें तालुक्यांत खैर फार आहे. तळोदें व नवापूर तालुक्यांच्या जंगलांत साग पुष्कळ असून शिसवही थोडा होतो. साकरी व नंदुरबार तालुक्यांतील डोंगराळ प्रदेशांत मोहाचीं झाडें असून इतर जळाऊ लांकूड पुष्कळ उत्पन्न होतें. अंजनाच्या झाडाच्या पाल्याचा उपयोग जनावरांस खाण्यास फार होतो. या झाडाच्या सालीपासून दोरखंडही तयार करितात. खैराच्या चिकापासून कात तयार होतो. साग हें बळकट व टिकाऊ लांकूड असल्यामुळें त्याचा इमारती व आगबोटी बांधण्याकडे फार उपयोग होतो. शिसवाच्या लांकडाचे खुर्च्या, कोच, देव्हारे, पाट वगैरे जिन्नस करतात. वर सांगितलेल्या जंगली वनस्पतींशिवाय तळोदें तालुक्यांत सातपुडा पर्वतावर चारोळी, रोशेल, मध, मेण, लाख, व टोळंबी यांचेंही उत्पन्न फार होतें. नवापुराकडे मोहाचीं झाडें पुष्कळ असून त्यांच्या फुलांपासून दारू तयार करितात. या अनेक जंगली वनस्पतींपैकीं साग हेंच या जिल्ह्यांतील मुख्य जंगली उत्पन्न असल्यानें सागासंबंधीं विशेष माहिती पुढें दिली आहे.




नं० १७:—जंगली वनस्पती.

# सागाच्या लांकडाची वखार.

या जिल्ह्यांत उत्तरेकडे सातपुड्यांत व पश्चिमेकडे सह्य पर्वतांत जंगल फार आहे. ह्या जंगलांत सागाचें उत्पन्न पुष्कळ होतें. पूर्वी ह्या जंगलाचा विस्तार बराच होता; परंतु मनुष्यवस्ती जसजशी वाढत चालली, रस्ते व रेलवे यांचा प्रसार होऊं लागला, तसतशी जंगलाची तोड झाली. या तोडलेल्या लांकडाचा उपयोग रेलवे व इमारती यांना पुष्कळ झाला. जंगलाच्या संहारामुळें पावसाचें मान कमी होऊं लागलें, तेव्हां सरकारनें जंगल राखून त्याची वाढ करण्याकरितां एक खातें काढिलें; त्यास फारेष्ट (जंगल) खातें म्हणतात. या जंगलाचें खुलें जंगल व बंदीचें जंगल असे दोन भाग आहेत. बंदीचें जंगल तळोदें व नवापूर या तालुक्यांत बरेंच आहे. जंगल पूर्ण वाढल्यावर त्यापैकीं कांहीं भागाचा लिलाव होतो. व्यापारी लोक लिलावांत काढलेले जंगलाचे गट विकत घेतात व भिल्ल लोकांकडून त्यांची तोड करवून लांकडाच्या पेठांत सागाचे सोट विकावयास नेतात. नवापूर, खांडबारा, नंदुरबार व तळोदें ह्या जिल्ह्यांतील लांकडाच्या मुख्य पेठा होत. चित्रांत नवापूर येथील लांकडाची एक वखार दाखविली आहे. सागाचे मोठमोठे सोट या चित्रांत किती तरी दिसत आहेत. व्यापारी लोकांच्या झोंपड्या व लांकूड घेऊन येणाऱ्या गाड्याही दिसत आहेत. या वखारींतून हजारों टन सागवानी लांकूड आगगाडींतून परमुलखास रवाना होतें. या लांकडापासून टांगे व गाड्या करण्याचे कारखाने या जिल्ह्यांत पुष्कळ झाले आहेत. या जिल्ह्यांत तयार केलेला खानदेशी टांगा पुढें आपण पाहूं.



नं० १८ :—सागाच्या लांकडाची वखार.

# खानदेशी टांगा.

हें खानदेशी टांग्याचें चित्र आहे. हे टांगे फार उंच नसून त्यास कमानही नसते. टांग्याला वर टप असून त्यावर पडदा सोडलेला असतो. खानदेशांत पूर्वी गोषाची चाल फार होती; शिवाय या जिल्ह्यांत ऊन, थंडी व धूळ हीं जास्त आहेत; त्यांपासून त्रास कमी व्हावा म्हणून टांग्याला पडदे लावण्याची चाल पडली असावी. ह्या टांग्याला जोडलेलीं घोडीं लहान दिसतात, पण तीं फार काटक असून एका दिवसांत ५०–६० मैलांची सफर करितात. शेतकरी साधारण सधन असला म्हणजे त्याच्याकडे टांगा असतोच. या टांग्यास कमान नसल्यामुळें आंत बसणाराला बरेच धक्के बसतात आणि प्रवास त्रासदायक व कंटाळवाणा होतो; परंतु खानदेशी लोकांस अशाच टांग्याची संवय असल्यामुळें एका लहानशा टांग्यांत पांच सात इसम सुद्धां बसून, ते मोठ्या आनंदानें प्रवास करितात. प्रत्येक खेड्यांत निदान १०–५ टांगे असतातच. येथील शेतकरी लोक व त्यांचीं मुलें टांगा हांकण्यांत व घोड्यावर बसण्यांत फार पटाईत असतात. हे लोक टांगे नेहमीं भरधांव हांकतात व त्यामुळें केव्हां केव्हां टांग्याचीं चाकें निखळूनही पडतात! म्हणून ह्या टांग्यांस वरचेवर दुरुस्ती करावी लागते. हल्लीं पक्क्या सडकांचा बराच विस्तार झाल्यामुळें जिल्ह्याच्या व तालुक्याच्या ठिकाणीं नगर पुण्याप्रमाणें कमानी टांगेही लोक करूं लागले आहेत. साधे टांगे व गाड्या करण्याचे कारखाने धुळें, तळोदें व नंदुरबार येथें आहेत.



नं० १९:—खानदेशी टांगा.

# मुख्य उद्योगधंदे.


जिल्ह्यांतील उत्पन्नावर उद्योगधंदे बहुतेक अवलंबून असतात. या जिल्ह्यांत कापूस हें मुख्य पीक असल्यामुळें त्यावर होणारे गिरणीकाम, विणकाम, रंगाचें काम हे ह्या जिल्ह्यांतील मुख्य उद्योगधंदे आहेत. त्याचप्रमाणें या जिल्ह्यांत जंगल पुष्कळ असल्यानें जंगलापासून उत्पन्न होणाऱ्या लांकडाचा व्यापार व लांकडी काम हेही धंदे चालतात. वर सांगितलेले उद्योगधंदे या नकाशांत चित्राच्या रूपानें दाखविले आहेत. कापसाच्या व्यापाराची धुळें ही मोठी पेठ असून तेथें गिरण्या पुष्कळ आहेत. यांशिवाय धुळें तालुक्यांत कुशल कारागीर असल्यामुळें तेथें तांब्यापितळेचीं भांडीं व आडकित्ते करण्याचेही कारखाने आहेत. शिरपूर तालुक्यांत नेमाडांतून पुष्कळ धान्य येतें म्हणून शिरपूर ही धान्याच्या व्यापाराची मोठी पेठच झाली आहे. शहादें व शिंदखेडें तालुक्यांत तापी कांठची जमीन फार सुपीक असल्यामुळें तेथें शेतीचेंच काम सर्वत्र पुष्कळ चालतें. जंगलांतील लांकडाच्या उत्पन्नामुळें तळोदें येथें गाड्या व टांगे करण्याचे कारखाने आहेत. तळोदें तालुक्यांत उत्पन्न होणारी एरंडी नंदुरबारला जाते, म्हणून तेथें तेल गाळण्याच्या गिरण्या आहेत. पांझरा नदीच्या पाटाच्या पाण्यामुळें साकरी तालुक्यांत ऊंस होतो, म्हणून त्या तालुक्यांत गूळ पुष्कळ तयार करितात. पश्चिमेकडील नवापूर व पिंपळनेरच्या भागांत पूर्वीं साळ पुष्कळ होत असून भाताचा व्यापार चालत असे, परंतु अलीकडे तो कमी झाला आहे. जिल्ह्याच्या उत्पन्नावर व उद्योगधंद्यावर तेथील व्यापार बहुतेक अवलंबून असतो, हें आतां आपणांस दिसेल.




नं० २०:—मुख्य उद्योग धंद्यांचा नकाशा.

# व्यापार.


जिल्ह्यांत उत्पन्न झालेलें पीक स्थानिक गरजांस पुरून उरल्यानंतर बाजारांत विक्रीस पाठवितात व मोठमोठे व्यापारी तो माल खरेदी करून परप्रांतीं रवाना करितात; अशा मालास निर्यात माल असें म्हणतात. या मालावरच जिल्ह्यांतील मुख्य व्यापार बहुधा चालतो. या जिल्ह्यांतील निर्यात मालाचा हा नकाशा आहे. धुळें तालुक्यांत कापूस, गिरणीकाम व विणकाम पुष्कळ होत असल्यामुळें येथून कापसाच्या गांठी, लुगडीं, खण, व रुमाल वगैरे बाहेर रवाना होतात. त्याचप्रमाणें लोण्याचाही व्यापार येथें मोठ्या प्रमाणावर चालतो. शिंदखेडें तालुक्यांतून बाजरी पुष्कळ बाहेर जाते. शिरपूर तालुक्यांत तिळीचें पीक विशेष होतें, म्हणून येथून पुष्कळ तीळ बाहेर रवाना होतो. नेमाडांतून येणारें धान्यही येथूनच बाहेर रवाना होतें. शहादें तालुक्यांत गव्हाचें उत्पन्न विशेष होत असल्यानें तेथून पुष्कळ गहूं बाहेर जातो व येथून तूपही बाहेर पाठविलें जातें. तळोदें तालुक्यांत जंगली उत्पन्नाचाच व्यापार विशेष चालतो. चारोळी, कात, मोह, मध, मेण, लाख, रोशेल हे जिन्नस विशेषतः येथून बाहेर पाठविले जातात; तसेंच लांकडी गाड्या व टांगे येथून इतर तालुक्यांत जातात. नंदुरबार तालुक्यांतून गहूं, हरभरा, मिर्ची, एरंडी व लांकूड हे पदार्थ फार रवाना होतात. साकरी तालुक्यांतून गूळ, तांदूळ, लांकूड, हे जिन्नस बाहेर पाठवितात. नवापूर तालुक्यांतून लांकूड व गवताचे गठ्ठे रवाना होतात. या अनेक व्यापारी जिनसांपैकीं कापूस, गहूं, लोणी, लांकूड व मिर्ची हे ह्या जिल्ह्यांतून बाहेर जाणारे मुख्य पदार्थ होत. हे पदार्थ कोणत्या बाजारांतून बाहेर रवाना होतात हें आतां पाहूं.




नं० २१:—निर्यात माळाचा नकाशा.

# दोंडाईचें येथील बाजार पेठ.


धुळें, शिरपूर, दोंडाईचें, नंदुरबार, नवापूर व कासारें या जिल्ह्यांतील मुख्य बाजारी पेठा होत. या सर्वांमध्यें धुळें येथील पेठ मोठी आहे. कारण धुळें हें रेल्वे स्टेशन असून त्याच्या सभोंवतीं पक्क्या सडकांचे रस्ते असल्यामुळें मालाची ने आण सहज करतां येते. शिवाय जिल्ह्याच्या राज्यकारभाराचें हें मुख्य स्थान असल्यामुळें या ठिकाणीं पुष्कळ व्यापारी लोक जमतात. या पेठेच्या खालोखाल शिंदखेडें तालुक्यांतील दोंडाईचें येथील पेठ आहे, कारण तेथेंही दळणवळणाच्या सोई चांगल्या असून जिल्ह्याच्या मध्यभागीं हें ठिकाण आहे. तेथील बाजाराचा देखावा या चित्रांत दाखविला आहे. हा बाजार अरुणावती नदीच्या वाळवंटांत दर गुरुवारीं भरतो. बाजारांतील दुकानांची रांग चित्राच्या वरील बाजूस दिसत आहे. या बाजारास जिल्ह्याच्या बहुतेक भागांतून व्यापारी लोक येतात व हजारों रुपयांची उलाढाल होते. मालाची ने आण करणाऱ्या शेतकरी व व्यापारी लोकांची कितीतरी गर्दी होते आणि शेंकडों गाड्या व हजारों जनावरें येथें जमतात. बाजाराच्या अगदीं मागच्या बाजूस अरुणावती नदीवर असणाऱ्या तापी व्हॅली रेल्वेचा लोखंडी मजबूत पूल चित्रांत दिसत आहे. व त्यावरून नरढाण्याकडे जाणारी आगगाडीही दिसत आहे. बाजारांतून कापूस, गूळ, मिर्ची, गहूं, व जनावरें हीं परमुलखांत रवाना होतात आणि तांदूळ, साखर, कापड, किराणामाल, यांत्रिक व स्टेशनरी सामान बाहेरून या ठिकाणीं विक्रीस येतें. मालाची ने आण करण्याकरितां या जिल्ह्यांत दळणवळणाच्या सोई कशा आहेत हें पुढील भागांत दिसून येईल.



नं० २२:—दोंडाईचें, बाजाराचा देखावा.

# दळणवळणांचीं साधनें.

पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील दळणवळणाच्या मार्गाचा हा नकाशा आहे. ह्या जिल्ह्यांत जलमार्ग नाहीं. रेल्वे, पक्क्या सडका, व साधे रस्ते यांवरूनच दळणवळण सुरू आहे. नकाशाच्या आग्नेय कोपऱ्यास चाळीसगांवाहून निघणारा जी. आय्. पी. रेल्वेचा फांटा शिरूड स्टेशनावरून धुळ्यास गेला आहे. या फांट्याची लांबी या जिल्ह्यांत सुमारें २० मैल आहे. नकाशाच्या मध्यभागीं तापी नदीशीं साधारण समांतर असा पूर्व पश्चिम गेलेला तापी व्हॅली रेल्वेचा मार्ग दिसत आहे. ही रेल्वे या जिल्ह्यांत बेटावद येथें सुरू होऊन नरढाणें, शिंदखेडें, दोंडाईचें, रनाळें, नंदुरबार, खांडबारा, चिंचपाडा व नवापूर ह्या स्टेशनांवरून जिल्ह्याच्या बाहेर सुरतेकडे गेली आहे. या रेल्वेची लांबी या जिल्ह्यांत सुमारें ९० मैल आहे. या जिल्ह्यांत हे आगगाडीचे दोनच मार्ग आहेत. ह्या जिल्ह्यांतील पक्क्या सडकांपैकीं सर्वांत मोठा रस्ता मुंबई आग्रारोड हा होय. हा रस्ता धुळें, शिंदखेडें व शिरपूर तालुक्यांतून होळकर हद्दींत गेला आहे. दुसरा पक्का रस्ता पूर्वखानदेशांतून पारोळ्यावरून मुकटी, धुळें, कुसुंबें, नेर, साकरी, दहिवेल या गांवांवरून कोंडाईबारींतून चिंचपाड्याकडे गेला आहे. या रस्त्याचा एक फांटा साकरीहून पिंपळनेरवरून नाशिक जिल्ह्यांत गेला आहे. यां शिवाय धुळ्याहून शिंदखेडें, शहादें, नंदुरबार व तळोदें येथें जाणेरेही पक्के रस्ते आहेत. जिल्ह्याच्या उत्तरेकडील तळोदें, शहादें व शिरपूर या तीन तालुक्यांत मोठे रस्ते नाहींत. जिल्ह्यांत कच्च्या सडका सर्वत्र आहेत परंतु पावसाळ्यांत त्या प्रवासास निरुपयोगी आहेत.




नं० २३ :—दळणवळणांच्या साधनांचा नकाशा.

# खानदेशी कुणबी लोक.

ह्या जिल्ह्यांत शेतकरी वर्गाचा म्हणजे खानदेशी कुणब्यांचा बराच मोठा भरणा आहे. हे खानदेशी कुणबी या चित्रांत दाखविले आहेत. या जिल्ह्यांतील अति उष्ण हवेमुळें हे लोक साधारण काळसर दिसतात. हे स्वभावानें गरीब, धार्मिक, प्रामाणिक व आनंदी असतात. यांच्या कित्येक कुटुंबांत गोषाची चाल अद्याप आहे. यांचा नेहमींचा पोषाक म्हणजे एक जाडें भरडें धोतर, एक सदरा, डोक्यास पागोटें आणि कानावरून व पागोट्यावरून बांधलेलें धोतराचें वेष्टण हा होय. उन्हाळ्यांत वाहणाऱ्या उष्ण वाऱ्या ( झळी ) मुळें व हिंवाळ्यांतील अति थंडीमुळें डोक्यास वेष्टण बांधण्याचा प्रघात पडला असावा असें वाटतें. यांचा मुख्य धंदा शेतीचा होय. शिक्षणाकडे व उद्योग धंद्यांकडे या लोकांचा फारसा कल दिसत नाहीं. उष्ण हवेमुळें हे लोक जरी फार उद्योगी नाहींत तरी शेतकाम वेळच्यावेळीं करितात. शेतकरी कुणबी पहाटेस उठून गुरांचा गोठा साफ करतो, नंतर दूध काढून न्याहारी करून गुरें चरावयास सोडतो व नंतर शेतांत शेतकाम करण्याकरितां जातो. कुणब्याची बायकोही रोजचीं घरांतील कामें करून दुपारचें जेवण व पाणी घेऊन शेतांत जाते आणि शेतीच्या कामास मदत करिते. कुणब्याचीं मुलें घरांतील गुरें सांभाळतात. याप्रमाणें कुणब्याचें सर्व कुटुंब शेतीच्या कामांत सर्व दिवसभर गुंतलेलें असतें. शेतकऱ्यास जगांत काय चाललें आहे याची कल्पनाही नसते ! जमिनीच्या अति सुपीकतेमुळें थोड्या श्रमांत शेतकरी लोक चांगला पैसा मिळवितात व राहिलेला वेळ गप्पागोष्टी आणि निरनिराळ्या यात्रा व उत्सव करण्यांत घालवितात. या उत्सवांपैकीं ह्या जिल्ह्यांतील बालाजीच्या रथोत्सवाचें वर्णन पुढें दिलें आहे.



नं० २४:—खानदेशी कुणबीलोक.

# बालाजीचा रथोत्सव-धुळें.

धुळ्यास जीं अनेक देवालयें आहेत, त्यांत बालाजीचें देवालय प्रसिद्ध आहे; व पश्चिम खानदेशांतील अनेक उत्सवांपैकीं बालाजीचा रथोत्सव फार प्रसिद्ध आहे. हा उत्सव आश्विन शुद्ध एकादशी पर्यंत असतो. पहिले दहा दिवस मारुती, घोडा, गरूड, मोर, नाग, वगैरे वाहनांवर बालाजीस बसवून रात्रीं थाटानें शहराच्या निरनिराळ्या भागांतून मिरवणूक काढितात व एकादशीस दोन प्रहरीं रथांतून मोठी मिरवणूक निघते. हा रथोत्सव पाहण्यास आसपासच्या भागांतून शेंकडों लोक जमा होतात. रथाची मिरवणूक आग्रारोडनें चाललेली या चित्रांत दाखविली आहे. चित्राच्या डाव्याबाजूस बाजारांतील दुकानांची रांग दिसत आहे व उजव्या बाजूस रथ आहे. रथाच्या पुढें व बाजूस लोकांचा अतिशय गर्दी झालेली आहे. रथावर लांकडी घोडे आहेत व रथ मनुष्यें ओढीत आहेत. रथाच्या मध्यभागीं बालाजीची मूर्ति बसविली असून दोन बाजूंस आरती व प्रसाद देण्याकरितां पुजारी उभे आहेत. रथाचें काम सुंदर असून प्रेक्षणीय आहे. रथ बांधण्यास इ० स० १८७५ सालीं सुरुवात होऊन इ० स० १८७७ सालीं काम पुरें होऊन प्रथम मिरवणूक निघाली. रथाला साडेअकरा हजार रुपये खर्च आला असें म्हणतात. अशा प्रकारचे रथोत्सव सोनगीर, बेटावद, शिंदखेडें, शिरपूर या गांवीं होतात. रथोत्सवाच्या वेळीं व्यापारही पुष्कळ चालतो. रथोत्सवाप्रमाणें या जिल्ह्यांतील जत्राही प्रसिद्ध आहेत. त्यांपैकीं धुळें येथील देवीच्या जत्रेच्यावेळीं रस्त्यांतून मिरविणारे तगतराव आपण आतां पाहूं.


9584



नं० २५ :—बालाजीचा रथोत्सव—धुळें.

# तगतराव.

खानदेशी लोक स्वभावतःच धार्मिक वृत्तीचे, आनंदी व हौशी असे आहेत. रिकाम्यावेळीं निरानराळ्या ठिकाणच्या देवादिकांच्या उत्सवांमध्यें व जत्रांमध्यें अनेक प्रकारें ते आपली करमणूक करून घेतात. या चित्रांत दाखविलेला ' तगतराव ' हा अशाच करमणुकीचा एक प्रकार आहे. प्रत्येक यात्रेच्या वेळीं असे तगतराव निघतात. अशिक्षित लोक जत्रेच्या दिवशीं देवास असा नवस करतात कीं, " माझा इच्छित कार्यभाग झाल्यावर मी तगतराव काढीन." पुढें नवस फेडण्याकरितां म्हणून यात्रेच्या दिवशीं हे तगतराव निघतात. तगतराव म्हणजे प्रथम एक उंच मजबूत लांकडी गाडी शृंगारतात व नंतर त्या गाडीवर फळ्या टाकून त्यावर बरेच तमासगीर लोक बसतात. तगतरावाच्या योग्यतेप्रमाणें गाडीला दोन चार बैल जोडतात. या चित्रांत दोन बैलांच्या गाडीचा तगतराव दाखविला आहे. गाडीवर तमासगीर लोक बसलेले आहेत. तगतराव रस्त्यानें चालले असतां वरील तमासगीरलोकांचें गायन, वादन व नृत्य हीं चाललेलीं असतात आणि तें ऐकण्याकरितां व पाहण्याकरितां तगतरावाच्या मागून पुष्कळ लोक रस्त्यानें धांवत असतात. यात्रेच्या ठिकाणीं मोकळ्या मैदानांत हे तगतरावांचे तमाशे रात्रीं होतात व ते पाहण्याकरितां शेंकडों लोक जमा होतात. सकाळीं स्नान, देवदर्शन करून तगतराव आपापल्या गांवीं परत जातात. यात्रेसारख्या पवित्र ठिकाणीं तगतरावासारखे तमाशाचे प्रकार एकंदरींत अनिष्ट खरे, परंतु ते शिक्षणप्रसारानें व सामाजिक सुधारणेनेंच हळुहळू नाहींसे होतील.



नं० २६ :—तगतराव.

# वंजारी लोक.

खानदेशी कुणब्यांनंतर या जिल्ह्यांतील विशेष प्रकारचे लोक म्हणजे वंजारी होत. वंजारी हा शब्द वनचर ( रानांत राहणारे ) किंवा वणिक् जहारी ( माल वाहणारे ) यांपासून झाला असावा. हे लोक उत्तर हिंदुस्थानांतून आले असें म्हणतात. या लोकांचे लहाणे, माधुरे वगैरे अनेक पोट प्रकार आहेत. हे लोक मुख्यतः बैलांवरून मालाची नेआण करीत असत. रेलवे सुरू होण्यापूर्वी सुरत ते बऱ्हाणपूर पर्यंतचा व्यापार यांच्या हातीं असून रनाळें हें गांव त्यांच्या व्यापाराचें केंद्र होतें. रनाळें येथें या लोकांच्या गाई इतक्या होत्या कीं, त्यांच्या दुधाचें झालेलें सर्व ताक न खपल्यामुळें तें गांवाबाहेर नाल्यांत सोडीत, त्यामुळें या गांवच्या नाल्यास ताकाचा नाला असें पडलेलें नांव अद्याप तेथें चालू आहे. रेलवे विस्तारामुळें या लोकांचा धंदा नाहींसा होऊन हे लोक शेती व मजुरी करूं लागले. या वंजारी लोकांचें कुटुंब येथें चित्रांत दाखविलें आहे. हे लोक उंच व बळकट असून उद्योगी व धार्मिक वृत्तीचे आहेत. यांचा पोषाक खानदेशी कुणब्यांप्रमाणेंच साधा असतो. यांच्या स्त्रिया मारवाडी स्त्रियांप्रमाणें खादीचा चित्रविचित्र झगा नेसतात. पायांमध्यें पितळी वाळे व घुंगूर घालतात, कानांत मण्यांचे निरनिराळे मोठ्या आकाराचे दागिने घालतात व नाकांत पितळेची मोठी नथ घालतात. सुवासिनी स्त्रिया डोक्यावर उंच काडी लावून तीवरून पदर घेतात. डोक्यावरील काडीची उंची त्यांच्या सामाजिक दर्जावर अवलंबून असते असें म्हणतात. या लोकांत पुनर्विवाह नाहीं. हे लोक गोकुळाष्टमीच्या दिवशीं मोठा उत्सव करितात.



नं० ७२:—वंजारी लोक.

# भिल्ललोक–मावची स्त्रिया.

सातपुडा व सह्य पर्वताच्या जंगलांत भिल्ल लोकांची वस्ती फार आहे. या लोकांच्या मावची, कोकणी, वारली व पावरे अशा निरनिराळ्या जाती आहेत. त्यांपैकीं मावची व कोकणी भिल्ल सह्याद्रीच्या भागांत नवापूर व साकरी तालुक्यांत आहेत. नवापुरच्या जंगलांतील मावची भिल्लांच्या स्त्रिया या चित्रांत दाखविल्या आहेत. यांचा चेहरा काळा असून बहुतेक कुरूपच दिसतो. जंगली प्रदेशांतील रोगट हवापाण्यामुळें यांचें पोट फुगून मोठें दिसतें; परंतु यांच्या शरिराची एकंदर बांधणी काटक व बळकट असते. हे लोक जंगलांत फिरून अनेक प्रकारचे उद्योगधंदे करितात. अलीकडे ते शेतीही करूं लागले आहेत. भिल्लांच्या स्त्रिया पूर्वीं फक्त कमरेला एक लहानसा कपडा गुंडाळीत असत व बाकी सर्व शरीर उघडें ठेवीत. परंतु अलीकडे या स्त्रिया चोळी घालून पदरही घेऊं लागल्या आहेत. यांच्या गळ्यांत शुभ्र पांढऱ्या दगडांच्या मण्यांच्या माळांचें ओझेंच असतें ! हेच यांचे अलंकार ! या लोकांना दारूचें व्यसन मोठें असून एकंदरींत हे लोक फार आळशी असतात. स्वच्छता, उद्योग व व्यवस्थितपणा हे गुण या लोकांमध्यें क्वचितच दिसतात. हे लोक बांबूच्या व गवताच्या झोंपड्या करून शेतांत किंवा जंगलांत रहातात. घरांतील एकादें मनुष्य मेलें असतां ती जागा सोडून व झोंपडी मोडून पुष्कळ दूर जातात. वाघदेव नांवाच्या एका देवास ते भजतात. यांचा भुतांखेतांवर फार विश्वास आहे. जेवताखातांना कोणी कोणाला पाहिलेलें यांना खपत नाहीं. यांचा चेहरा क्रूर व रागीट दिसतो. हे लोक अलीकडे मोलमजुरी व सरकारी नौकरी करूं लागले आहेत. पोलीस खात्यांत मावची भिल्लांचा बराच भरणा आहे.



नं० २८ :—भिल्लस्त्रिया.

# पावरे भिल्ल कुटुंब.


सातपुडा पर्वतांत राहणारे पावरे भिल्लांचें एक कुटुंब या चित्रांत दाखविलें आहे. पावरे लोकांचें स्वरूप व रहाणी ही मावची भिल्लांपेक्षां निराळी असते. हे लोक उंच, मजबूत व सुस्वरूप दिसतात. यांचीं बायका-मुलें, काटक असून चलाख व देखणीं दिसतात. यांचा पोषाक फार साधा असतो. धोतराचा एक भाग कमरेला गुंडाळून दुसरा भाग ते अंगावर घेतात. यांच्या बायका गळ्यांत मण्यांच्या माळा घालतात, व पायांत पितळेचीं अनेक कडीं घालतात. पुरुषांच्या डोक्यावरील केस लांब व काळे असून कित्येक पुरुष डोकीला कपडा गुंडाळ-तात. पावरे भिल्ल रजपुतांचे वंशज आहेत असें म्हणतात. उदेपूरच्या संस्थानिकांनीं पालगड किल्लयाजवळ राहणाऱ्या ज्या रजपुत लोकांना दक्षिणेस हांकून दिलें, तेच हे पावरे भिल्ल होत. हे लोक मेहनती, आनंदी, दिलदार, प्रामाणिक व दयाळू आहेत. हे परकीयांचें आदरातिथ्य चांगलें करितात. यांच्या बायका हुशार व धीट असून घरांतील सर्व व्यवस्था स्वतंत्रपणें पाहतात. हे लोक परकीयांशीं सहसा बोलत नाहींत, परंतु ओळख होऊन, विश्वास बसल्यावर फार मोकळ्या मनानें पुष्कळ बोलतात. हे शेतीवर आपला उदरनिर्वाह करितात. आपल्या निर्वाहास लागणारे सर्व जिन्नस स्वतःच्या शेतांत ते उत्पन्न करितात. लहान कपडेही ते स्वतःच विणतात. मिठाशिवाय कोणताही पदार्थ हे लोक विकत घेत नाहींत. दारूचें व्यसन ह्या लोकांत फार कमी आहे. यांचें शरीर, पोषाक व घर हीं स्वच्छ असून त्यांची राहणी साधी व व्यवस्थित असते. यांची वस्ती सातपुड्याच्या भागांत बरीच आहे.



नं० २९ :—पावरे भिल्ल कुटुंब.

# लोकसंख्या.

सपाट प्रदेश, उत्तम जमीन, चांगलें हवापाणी, निर्वाहाचें भरपूर उत्पन्न, दळणवळणाचे सोईचे मार्ग व शांतता ह्या साधनांची जेथें अनुकूलता असते, तेथें लोकवस्ती दाट असते असें म्हणतात. ही गोष्ट ह्या जिल्ह्यास कितपत लागू पडते हें आतां आपण पाहूं. तापी नदीच्या पूर्व खोऱ्यांत सपाट प्रदेश, सुपीक जमीन, निरोगी हवा, बेताचा पाऊस, पुष्कळ उत्पन्न, रेल्वेच्या व रस्त्याच्या सोई असल्यामुळें या जिल्ह्याच्या पूर्व भागांतील शिंदखेडें तालुक्यांत लोकवस्ती फार दाट आहे. शहादें व धुळें तालुक्यांत वरील गोष्टी साधारण मानानें अनुकूल असल्यामुळें लोकवस्ती तेथें साधारण दाट आहे. तळोदें व शिरपूर तालुक्यांच्या दक्षिणेकडील भाग आणि नंदुरबार व साकरी या तालुक्यांचा पूर्व भाग येथें लोकवस्ती साधारण पातळ आहे. शिरपूर व तळोदें तालुक्यांत उत्तरेकडील भागांत आणि नवापूर व साकरी तालुक्यांत पश्चिमेकडील भागांत प्रदेश डोंगराळ, जमीन नापीक, हवा रोगट, निर्वाहाचें साधन कमी व दळणवळणाच्या गैरसोई असल्यामुळें लोकसंख्या तेथें फारच पातळ आहे. ह्या जिल्ह्याची एकंदर लोकसंख्या अदमासें साडेसहा लक्ष आहे; क्षेत्रफळाच्या व लोकसंख्येच्या दृष्टीनें विचार केला असतां शिंदखेडें तालुका अति दाट वस्तीचा; शहादें, शिरपूर, नंदुरबार आणि धुळें हे तालुके मध्यम वस्तीचे व तळोदें, साकरी आणि नवापूर हे तालुके फार पातळ वस्तीचे आहेत. क्षेत्रफळाच्या मानानें या जिल्ह्यांतील एकंदर लोकसंख्येचें प्रमाण दर चौरस मैलाला ११८ पडतें.




नं० ३० :—लोकसंख्येचा नकाशा.

# भूगोल.

पश्चिम खानदेश जिल्ह्याचें भूपृष्ठस्वरूप म्हणजे प्रदेशांतील उच्चनीच भाग, उतार, नद्या व त्यांवर अवलंबून असणारें जिल्ह्याचें हवामान व पावसाचें मान आपण पाहिलें. जिल्ह्याची हवा एकंदरीनें बरीच उष्ण व पाऊस कमी हें ठरविलें. स्वाभाविक स्वरूप, हवा व पाऊस यांवर अवलंबून असणारी जिल्ह्याची सुपीकता व पिकें पाहिलीं. जिल्ह्यांतील मुख्य उत्पन्न जी कपाशी तिचें शेत, कपाशीच्या गाड्या, जंगली वनस्पती व लांकडाच्या वखारी पाहिल्या. जिल्ह्यांतील पिकांवरून उत्पन्न होणारे उद्योगधंदे व व्यापार यांचा विचार करून, व्यापारास अवश्य लागणारीं दळणवळणाचीं साधनें पाहिलीं. जिल्ह्याच्या निरनिराळ्या भागांत राहणारे खानदेशी कुणबी, वंजारी व भिल्ल हे लोक पाहिले. सामान्य लोकस्थिति, लोकांची रहाणी, चालीरीति व त्यांचा स्वभाव वगैरे गोष्टींचा विचार करून पश्चिम खानदेश जिल्ह्यांत लोकवस्ती कोठें दाट आहे व कोठें विरळ आहे आणि ती तशी कां याचा विचार केला. लोकांच्या स्वभावावर व उद्योगधंद्यावर अवलंबून असणारे लोकांचे पराक्रम व त्यांच्या हातून झालेलीं कार्यें म्हणजे जिल्ह्याचा इतिहास आतां पहावयाचा आहे व त्यावरून प्रदेशाचा भूगोल व इतिहास यांचा परस्पर निकट संबंध असतो, व ते एकमेकावर कसे अवलंबून असतात हेंही समजणार आहे.


[library stamp]


# इतिहास.

ह्या जिल्ह्याच्या पूर्व इतिहासाचा आपण विचार केला असतां पश्चिम खानदेश जिल्ह्याचा प्रदेश हा पुराणांत वर्णन केलेल्या खांडववनाचा एक भाग होता व या प्रदेशांत पांडवांचें वास्तव्य कांहीं काळ होतें असें दिसतें. पौराणिक कालानंतर हा प्रदेश आंध्रभृत्य राजांच्या ताब्यांत जाऊन पुढें क्रमानें अहीर, चालुक्य व यादव या वंशांतील राजांच्या ताब्यांत गेला. यादव वंशांतील राजांचा तघलक घराण्यांतील बादशहांनीं पराभव केल्या-नंतर खानदेश मुसलमानांच्या ताब्यांत आला. मुसलमान घराण्यांतील फारुकी व मोंगल या वंशांतील बादशहांनीं या जिल्ह्यावर राज्य केलें. मोंगल वंशाच्या ऱ्हासानंतर हा देश मराठे व पेशवे यांच्या ताब्यांत जाऊन पेशवाई बुडाल्यानंतर इ. स. १८१८ सालीं इंग्रजांच्या ताब्यांत आला. याप्रमाणें या प्रदेशावर अनेक राजांनीं राज्य केलें असून त्या सर्वांच्या कृत्यांचीं, पराक्रमांचीं व उद्योगांचीं स्मारकें ह्या जिल्ह्यांत अनेक रूपांनीं अस्तित्वांत असलेलीं दिसतात. तीं पाहून या जिल्ह्याच्या पूर्वकालच्या इतिहासाचें ज्ञान करून घेण्याकरितां या जिल्ह्याच्या निरनिराळ्या भागांतून प्रवास केला पाहिजे. या प्रवासास प्रथम जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं म्हणजे धुळें शहरीं प्रारंभ करून प्रत्येक तालुक्यांतील महत्त्वाचीं प्रेक्षणीय स्थळें आपण पाहूं. धुळें तालुक्यांतील शिरूड, लळिंग व सोनगीर हीं स्थळें पाहून नंतर शिंदखेडें तालुक्यांतील मुडावद क्षेत्रीं जाऊं. मुडावदेहून थाळनेर, प्रकाशें, तळोदें, धडगांव असा प्रवास करून पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या उत्तर सरहद्दीवर असणाऱ्या नर्मदा नदीचें दर्शन घेऊं. नंतर परत तळोद्याहून कुकुरमुंडें, नंदुरबार, नवापूर, पानखेड व बलसाणें या ठिकाणीं जाऊन धुळ्यास परत येऊं.

# धुळें रेलवे स्टेशन.


चाळिसगांवाहून जी. आय. पी. रेलवेचा फांटा पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील शिरूड स्टेशनावरून धुळ्यास आला आहे. ही रेलवे इ० स० १८९९ सालीं सुरू झाली. पूर्वीं चाळिसगांवीं उतरून टांग्यानें ३५ मैल प्रवास करावा लागे व त्यामुळें प्रवाशांस बराच त्रास होत असे; परंतु रेलवे सुरू झाल्यापासून हा प्रवास दीड तासांत सुखानें करतां येतो. धुळें येथील रेलवे स्टेशनचा देखावा चित्रांत दाखविला आहे. चाळिसगांवाकडे जाणारी गाडी स्टेशनावर उभी असलेली चित्रांत दिसते. गाडींत बसण्याकरितां प्रवाशांची गर्दी झालेली आहे. स्टेशन प्लॅटफार्मवर कांहीं टेबलें, खुर्च्या व बाकें पडलेलीं दिसत आहेत. त्यांच्या पलीकडे गाडींतून जाणाऱ्या मालाचा ढीग आहे. दररोज दोन गाड्या जातात व येतात. या गाडीचा वेग बराच कमी असतो. रेलवे रस्ता एकेरी आहे. या रेलवेमुळें धुळें शहराला व पश्चिम खानदेश जिल्ह्यालाही बरेंच महत्त्व आलें. व्यापार अतोनात वाढून लोकवस्तीही वाढली. परजिल्ह्याशीं दळणवळण जास्त होऊन थोड्या खर्चांत व थोड्या वेळांत बराच प्रवास करतां येऊं लागला. पुष्कळ लोक परप्रांतीं जाऊन आपला उत्कर्ष करून घेऊं लागले. धर्म व आचार विचार यांच्यावर न कळत परिणाम झाला. मनुष्यांचे विचार वाढले, परंतु आचार सुटूं लागले. या रेलवेमुळें लागवडीची शेंकडों एकर जमीन मात्र अडाविली गेली. पश्चिम खानदेश जिल्ह्यांत प्रवास करणाऱ्या मनुष्यास प्रथम याच स्टेशनावर उतरावें लागतें. पुढें कोणत्या क्रमानें प्रवास करावा लागतो हें आतां पाहूं.



नं० ३१:—धुळें रेलवे स्टेशन.

# सरकारी दवाखाना—धुळें.


धुळें रेल्वे स्टेशनावर प्रवासी उतरल्यानंतर टांग्यांत बसून धुळें शहराकडे जाऊं लागला म्हणजे स्टेशन पासून सुमारें अर्ध्या मैलावर शहरांत जातांना डाव्या बाजूस चित्रांत दाखविलेली इमारत दिसते. या इमारतीच्या पुढच्या बाजूस एक उंच दगडी स्तंभ असून स्तंभाच्या पुढें एक लांकडी चौकोनी कठडा आहे. चित्रांत मागच्या बाजूस दिसणारी इमारत ही धुळें येथील सरकारी दवाखान्याच्या इमारतीची मागील बाजू आहे. दवाखान्याची मुख्य इमारत व स्तंभ यांच्यामध्यें दिसणारी एक लहानशी खोली ही शस्त्रक्रिया करण्याची जागा आहे. या दवाखान्यांत पन्नास रोगी ठेवण्याची सोय केलेली आहे. रोग्यांस फुकट औषध दिलें जातें, म्हणून जिल्ह्याच्या बहुतेक भागांतून आजारी लोक उपचाराकरितां येथें येतात. चित्रांत मध्यभागीं दिसणारा भव्य दगडी स्तंभ हें एक ऐतिहासिक स्मारक आहे. इ० स० १८१८ सालीं इंग्रज सरकारनें जेव्हां खानदेश काबीज केला, त्यावेळीं मद्रास फौजेंतील एक लष्करी अधिकारी या ठिकाणीं मरण पावला. त्याचें स्मारक म्हणून हा स्तंभ उभारला गेला. स्तंभाच्या अलीकडच्या बाजूस दिसणाऱ्या कठड्याच्या आंत पर्जन्यमापक यंत्र आहे. वर्षांतून सरासरीनें एकंदर पाऊस किती पडतो, हें समजण्याकरितां या यंत्राची योजना केलेली आहे. हवामान व पाऊस यांत वेळोवेळीं होणारा फरक समजावा, म्हणून प्रत्येक दवाखान्यामध्यें उष्णतामापक व पर्जन्यमापक यंत्रें ठेवलेलीं असतात. येथून प्रवासी शहराकडे पुढें चालला असतां डाव्या बाजूस १००–१२५ यार्डांवर टेक्निकल स्कूलची भव्य इमारत लागते, ती आपणास पुढें दिसेल.



नं० ३२:—सरकारी दवाखाना—धुळें.

# टेक्निकल स्कूल-धुळें.


सरकारी दवाखान्यांतून निघून शहराच्या बाजूस सुमारें १००-१५० यार्ड गेल्यावर टेक्निकल स्कूलची ( धंदे शिक्षणाची शाळा ) भव्य इमारत एका विस्तृत पटांगणांत असलेली दिसते. ह्या इमारतीचा पाया मुंबईचे माजी गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क यांच्या हस्तें इ० स० १९१२ सालीं बसविला व इमारतीचें काम इ० स० १९१५ सालीं पुरें झालें. या इमारतीची लांबी १५३ फूट, रुंदी ४३ फूट व उंची ४४ फूट असून सर्व इमारत दगडी आहे. ही इमारत बांधण्यास ११०००० रुपये खर्च आला व हा सर्व पैसा जिल्ह्यांतील लोक व सरकार यांनीं वर्गणी देऊन जमविला. ही इमारत दुमजली असून इमारतीच्या उंच गच्चीवरून सभोंवतालचा धुळें शहराचा देखावा फार सुंदर दिसतो. इमारतीच्या आंतल्या बाजूस चार प्रशस्त दिवाणखाने असून इतर शिक्षणाकरितां व उद्योग शाळेकरितां प्रशस्त खोल्या आहेत. या शाळेंतील शिक्षणक्रम चार वर्षांचा असून त्यांत इंग्रजी, मराठी व अंकगणित हे सामान्य शिक्षणाचे विषय शिकवून शिवाय चित्रकला, सुतारकाम, लोहारकाम, विणकाम व यंत्रकला इत्यादि व्यवहारोपयोगी विषयही शिकवितात. या शाळेंतील विद्यार्थ्यांस त्यांच्या लायकीप्रमाणें पांच, दहा व पंधरा रुपये शिष्यवृत्ति मिळते. या शाळेवर सुपरिंटेंडेंट या हुद्याचे अधिकारी असून ते सर्व शिक्षणावर देखरेख करितात. ही शाळा लोकलबोर्डाच्या ताब्यांत आहे व तिच्या व्यवस्थेकारतां आठ सभासदांची कमेटी असून तिचे अध्यक्ष लोकलबोर्डाचे प्रेसिडेंट साहेब असतात.



नं० ३३ :—टेक्निकल स्कूल-धुळें.

# क्लॉक टॉवर–धुळें.


टेक्निकल् स्कूल पाहून झाल्यानंतर थोड्याशा अंतरावर गांवांत जातांना डाव्या बाजूस चित्रांत दाखविलेला सुंदर देखावा दृष्टीस पडतो. हें चित्र धुळें येथील म्युनिसिपल बागेंतील घड्याळाच्या टॉवरचें आहे. अशा क्लॉक टॉवरची कल्पना मूळ युरोपखंडांतील आहे. परंतु अलीकडे असे टॉवर मुंबई, पुणें, सुरत, अहमदाबाद वगैरे अनेक शहरीं झाले आहेत. चित्रांतील टॉवर सुमारें इ० स० १८६५ सालीं बांधला गेला. टॉवरवर मोठें घड्याळ लाविलें असून वरच्या बाजूस बरीच मोठी घंटा आहे. प्रत्येक तासास या घंटेंतून ठोके पडतात. टॉवरची उंची ७५ फूट असून वर जाण्याकरितां आंतून लांकडी जिना आहे. टॉवरच्या वर गेलें असतां प्रत्येक बाजूस दोन दोन कमानी दिसतात. या कमानींतून शहराचा देखावा फार सुंदर दिसतो. टॉवरच्या सभोंवार म्युनिसिपालिटीची बाग आहे. या बागेंत उत्तम फुलझाडें व मागच्या बाजूस कांहीं फळझाडेंही लाविलीं आहेत. सायंकाळीं हवा खाण्याकरितां व बागेंतील सृष्टिशोभा पाहण्याकरितां या ठिकाणीं बायकामुलें जमतात. त्यांच्या आरामाकरितां निरनिराळ्या ठिकाणीं बांक ठेविले असून बागेची व्यवस्था म्युनिसिपालिटीनें एकंदरींत चांगली ठेविली आहे, हें म्युनिसिपालिटीच्या कर्तव्यदक्षतेचें एक चिन्ह आहे. ही बाग पाहून थोडें उत्तरेस गेल्यावर समोरच म्युनिसिपल ऑफिसची इमारत दिसेल.



नं० ३४ :—क्लॉक टॉवर—धुळें.

# म्युनिसिपल ऑफिस–धुळें.


हें चित्र धुळें येथील म्युनिसिपालिटीच्या कचेरीचें आहे. कचेरीच्या मुख्य दरवाजाजवळ एक शिपाई उभा असलेला चित्रांत दिसत आहे. इमारतीच्या समोर लहानशी टुमदार बाग असून इमारतीवर निरनिराळ्या वेली चढवून तिच्या अपूर्व शोभेंत भर घातली आहे. इमारतीच्या समोर बागेंत असलेल्या पाण्याच्या कारंजांतून उंच उडालेले तुषार चित्रांत दिसत आहेत. ह्या इमारतीची कोनशिला मुंबईचे माजी गव्हर्नर सर जॉर्ज क्लार्क साहेब यांनीं तारीख ३०--१२--१९१२ रोजीं बसविली व या सुंदर इमारतीचा प्लॅन एक्झिक्यूटिव्ह इंजिनिअर कु.खे. देसाई यांनीं तयार केला. ही इमारत दुमजली असून इमारतीच्या सभोंवार सुंदर कमानी ठेविल्या आहेत. खालच्या मजल्यांत आंतील बाजूस म्युनिसिपल कचेरी आहे. दुसऱ्या मजल्यावर जाण्याकारितां दोन जिने ठेविले आहेत. माडीवरील दिवाणखाना भव्य व प्रशस्त आहे. या दिवाणखान्यांत म्युनिसिपालिटीच्या सभा भरतात व इतर सरकारी समारंभ केव्हां केव्हां याच दिवाणखान्यांत होतात. इमारतीच्या वरच्या बाजूस सुंदर गच्ची केली असून चार बाजूंस घुमट बांधिले आहेत. येथून शहराच्या सभोंवतालचा देखावा सुंदर दिसतो. ही इमारत सर्व दगडी असून हिला २७००० रुपये खर्च आला असें म्हणतात. ह्या इमारतीच्या उत्तरेच्या बाजूस ४०—५० यार्डांवर धुळें शहरांतील सर्वांत जुनी व सुंदर अशी दगडी शाळेची इमारत आहे, ती पाहाण्यास आपण आतां जाऊं.



नं० ३५ :—म्युनिसिपल ऑफिस--धुळें.

# ट्रेनिंग कॉलेज–धुळें.


धुळें शहरांतील ट्रेनिंग कॉलेज ही एक अति महत्त्वाची सरकारी शिक्षणसंस्था आहे. या संस्थेची इमारत या चित्रांत दाखविली आहे. धुळें शहरांतील अति जुन्या इमारतींपैकीं ही एक होय. इमारतीचें बांधकाम सर्व दगडी असून फार मजबूत आहे. इमारतीच्या दगडी कामावरूनच हिला दगडी शाळा असें पूर्वीं म्हणत असत. ही इमारत भव्य व सुंदर असून दुमजली आहे. इमारतीच्या सभोंवार सज्जा (ग्यालरी) असून त्यावर मोठमोठ्या दगडी कमानी आहेत. ही इमारत मूळ लोकल बोर्डाची असून तींत कित्येक दिवस मराठी नंबर १ चीं शाळा पूर्वीं भरत असे. इ० स० १८८९ सालीं प्राथमिक शिक्षकांचे ट्रेनिंगस्कूल सुरू करण्याचें ठरल्यावर सरकारच्या मागणीवरून लोकल बोर्डानें ही इमारत सरकारच्या स्वाधीन केली. जसजसा शिक्षण प्रसार जास्त होत चालला, तसतसा अधिक विद्यार्थिवर्ग ट्रेनिंगस्कुलांत येऊं लागला. अर्थात् मूळची इमारत पुरेनाशी होऊन नवीन पांच इमारती शिक्षणाकरितां बांधिल्या गेल्या. तसेंच विद्यार्थ्यांस राहण्याकरितां विद्यार्थि-वसतिगृहाची अवश्यकता उत्पन्न होऊन दोन मोठालीं विद्यार्थिवसतिगृहें बांधलीं गेलीं. विद्यार्थ्यांवर देखरेख ठेवण्याकरितां प्रिन्सिपालसाहेब व सुपरिंटेंडेंट यांजकरितां बंगलेही बांधले. दगडी इमारतीच्या दक्षिणबाजूस टुमदार बाग आहे. इ० स० १९२० सालीं ट्रेनिंगस्कूलचें ट्रेनिंग कॉलेजांत रूपांतर झालें. हल्लीं कॉलेजामध्यें २०० विद्यार्थी शिकत असून शिक्षणक्रम तीन वर्षांचा आहे.



नं० ३६ :—ट्रेनिंग कॉलेज–धुळें.

# कालिका देवीचें देवालय–शिरूड.


धुळ्याच्या दक्षिणेस १४ मैलांवर शिरूड नांवाचें रेलवे स्टेशन आहे. स्टेशनापासून शिरूड गांव सुमारें पाऊण मैल आहे. या गांवच्या मध्यभागीं देवीचें एक पुरातन देवालय आहे. पुष्कळ काळपर्यंत या देवालयाचा बराच भाग जमिनींत बुजलेला होता. परंतु १५–२० वर्षांपूर्वीं रामनाथ बुवा नांवाच्या एका भक्तानें माती वगैरे काढून देवालय खुलें केलें. देवालयाच्या बांधणीवरून हें देवालय हेमाडपंती देवालयाच्या पूर्वीचें, व जैन लोकांनीं बांधलेलें असावें असें दिसतें. या देवालयास कालिकेचें देवालय असें म्हणतात. कालिकादेवी म्हणजे कोल्हापूरचीच जगदंबा आहे असें सांगतात. या देवीला कोणी भक्तानें येथें आणिलें असेंही म्हणतात. मुसलमान बादशहांच्या धामधुमीच्या काळीं देवालयाचा बचाव व्हावा, म्हणून हें देवालय जमिनींत बुजविलें असावें असें दिसतें. देवालयाच्या सभोंवार दगडी कोट असून तो पेशव्यांच्या वेळीं बांधला गेला असें सांगतात. देवळांत आंतील बाजूस दोन मूर्ती असून एक जुनी व एक नवीन बसविलेली दिसते. या देवीसंबंधानें बऱ्याच आख्यायिका सांगतात. देवळाच्या मागच्या बाजूस एक विहीर आहे. त्या विहिरींतून देवीची प्रार्थना केली असतां उत्सवाच्या व लग्नाच्या वेळीं लागणारीं सर्व भांडींकुंडीं पूर्वीं निघत असत, अशी दंतकथा आहे. देवीची यात्रा माघ शुद्ध १५ स भरते. देवीची पूजाअर्चा करण्याकरितां ‘ कासार ’ पुजारी असून देवीच्या खर्चाबद्दल दिलेला ताम्रपट त्याजवळ आहे. हें पुरातन देवालय पाहिल्यानंतर धुळ्याच्या दक्षिणेस असलेला लळिंगचा ऐतिहासिक किल्ला पहावयास जाऊं.



नं. ३७:—कालिका देवीचें देवालय–शिरूड.

# ललिंगचा किल्ला.


धुळ्याच्या दक्षिणेस सात मैलांवर मुंबई–आग्रारोडवर हा किल्ला आहे. हा मोंगलांच्या कारकीर्दींत बांधला असावा. सह्याद्रीच्या फांद्यांपैकीं एका उंच डोंगराच्या शिखरावर हा किल्ला बांधिला आहे. किल्ल्याचें बांधकाम बहुतेक दगडी असून फार मजबूत दिसतें. ललिंग गांवच्या दक्षिणेस रस्त्यावरच असणाऱ्या एका देवालयाजवळून किल्ल्यावर जाण्याचा रस्ता आहे. प्रथमतः थोडासा सपाट प्रदेश असून पुढें डोंगराच्या बाजूबाजूनें रस्ता नागमोडी झालेला चित्रांत दिसत आहे. सुमारें अर्धा मैल चढून गेल्यावर, पुढें बराच कठीण चढाव लागतो. डोंगराच्या माथ्यावर गेल्यानंतर प्रथमतः किल्ल्याचा कोट लागतो. कोटाच्या आंतल्या बाजूस जुन्या पडक्या इमारतीचे राहिलेले भाग दृष्टीस पडतात. या पडक्या इमारतीच्या उत्तरेस देवीचें देऊळ आहे. हें शिवाजीच्या वेळीं बांधलें गेलें असें म्हणतात. खानदेश जिंकल्यावर हा किल्ला फिरोजशहा तघलकानें इ. स. १३७० सालीं आपल्या ताब्यांत घेतला व त्यावर मलिक राजा फारुकी नांवाचा सरदार नेमला. पुढें खानदेशचा सर्व भाग मलिक राजास मिळाल्यानंतर मलिक राजाच्या पश्चात् त्याचा वडील मुलगा मिरन यास हा किल्ला मिळाला. इ. स. १४३७ सालीं बहामनी राज्यांतल्या एका सरदारानें, इ. स. १६०० सालीं अकबरानें आणि इ. स. १६३० सालीं शहाजनानें या किल्ल्यास वेढा दिला होता. पुढें मराठी आमदानींत प्रतापराव गुजर, शिवाजीमहाराज, शाहूराजे, पहिले बाजीराव, थोरले माधवराव पेशवे, यांनीं अनुक्रमें या किल्ल्यावर हल्ले केले होते. पुढें हा किल्ला पेशव्यांचे सरदार विंचूरकर यांजकडे गेला व पेशवाई बुडाल्यानंतर इ. स. १८१८ सालीं इंग्रजांकडे आला.



नं. ३८ :—ललिंगचा किल्ला.

# पांझरा नदीवरील पूल.


धुळें शहरच्या दक्षिणेकडील स्थळें पाहिल्यानंतर धुळ्याच्या उत्तरेस असलेला सोनगीरचा किल्ला पहावयास जाऊं. तिकडे जातांना धुळें शहराच्या उत्तर टोंकास असणाऱ्या पांझरा नदीच्या पुलावरून जावें लागतें. या पुलाचा देखावा येथें दाखविला आहे. चित्राच्या मध्यभागीं उन्हाळ्यांत कमी झालेला नदीचा प्रवाह दिसत आहे. प्रवाहाच्या पलीकडे वाळवंटांत सोडलेल्या गाड्या व बैल असून त्यांच्या पलीकडे पूल दिसत आहे. पांझरा नदीच्या उगमापासून ५५ मैलांवर हा पूल बांधला आहे. या ठिकाणीं नदीचें पात्र फार रुंद असल्यानें पावसाळ्यांत नदीस पूर आला म्हणजे पुलावरून नदीचा देखावा भव्य दिसतो. या पुलास एकंदर १५ कमानी आहेत. पुलाची लांबी ११८३ फूट असून रुंदी व उंची अनुक्रमें २५ व २८ फूट आहे. हा पूल इसवी सन १८६०–६१ सालीं बांधला गेला व याला पाऊण लाख रुपये खर्च आला असें म्हणतात. या पुलाच्या योगानें दळणवळणास बरीच मदत होऊन धुळ्याचा व्यापार वाढला. पावसाळ्यांत सुद्धां जिल्ह्याच्या सर्व भागांतून धुळ्याशीं व्यवहार चालू झाले. टांगे, गाड्या, मोटारी यांतून प्रवास करण्यास बरीच सोय झाली. या नदीला एकंदर दोन पूल आहेत. धुळें येथील हा एक पूल व बेटावद नजीकचा रेलवेचा पूल. इ.स. १८७२ सालीं सप्तंबर महिन्यांत पांझरेस महापूर आला व धुळें गांवांत पाणी शिरलें; त्यावेळीं पुलावर पाणी बरेंच चढलें होतें असें म्हणतात ! या पुलावरून सोनगीरचा किल्ला पहावयास आतां जावयाचें आहे.



नं० ३९ :—पांझरा नदीवरील पूल.

# सोनगीरचा किल्ला.


धुळ्याच्या उत्तरेस बारा मैलांवर सोनगीर (सुवर्णगिरी) नांवाचें फार जुनें गांव आहे. गांवाच्या उत्तरेस सुमारें चारशें यार्डांवर डोंगरावर हा किल्ला आहे. किल्ल्यावर जाण्याचा मार्ग चांगला असून फारसा चढाचा नाहीं. किल्ल्याचा बहुतेक भाग पडलेला असून त्यावर पहाण्यासारखें विशेष कांहीं नाहीं. किल्ल्यावर एक शिलालेख होता, तो नुकताच मुंबईच्या पदार्थसंग्रहालयांत ठेवण्याकरितां नेला. किल्ल्याच्या उत्तर व दक्षिण बाजूस थोडासा बांधीव तट असून बाकीच्या बाजूस खडक फोडून ओबड धोबड तटबंदी केलेली दिसते. किल्ल्याची लांबी ३०० यार्ड असून रुंदी १० पासून १५ यार्डपर्यंत आहे. किल्ल्यावर पूर्वीं विहिरीचें पाणी सभोंवार फिरविलें असावें, असें तेथें पडलेल्या पाण्याच्या नळांच्या अवशेष भागावरून वाटतें. किल्ल्याचा दरवाजा पूर्वबाजूस असून दरवाज्या जवळच एक पाण्याचें टांकें आहे. हा किल्ला प्रथमतः अरब लोकांच्या ताब्यांत होता. पूर्वीच्या धामधुमीच्या काळीं बंडखोर लोकांस या अरबांचा बराच आश्रय होता असें म्हणतात. पुढें हा किल्ला बराचकाळपर्यंत मोंगलांच्या ताब्यांत असून पुढें हैदराबादच्या निजामाच्या ताब्यांत गेला. मराठे शाहींत या किल्ल्याची व्यवस्था सरदार विंचूरकर यांजकडे होती. इ. स. १८१८ सालच्या सुमारास या ठिकाणीं बरेच दंगेधोपे होऊन, हा किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत गेला. हा किल्ला पाहिल्यावर सोनगीर येथें रहात असलेले श्रीगोविंदमहाराज यांच्या दर्शनास जाऊं.



नं० ४० :—सोनगीरचा किल्ला.

# सोनगीरचे श्रीगोविंद महाराज.


सोनगीर गांवच्या उत्तरेस दोन फर्लांगावर एक मोठी विहीर आहे. या विहिरीजवळच एक मोठें पिंपळाचें झाड आहे. त्या झाडाखालीं बसलेले श्रीगोविंदमहाराज या चित्रांत दिसत आहेत. महाराजांच्या समोर त्यांचा हातांत धरण्याचा दंड पडलेला असून, त्याजवळच एका फळीवर तबक, लेखणी व कलमदान दिसत आहे. महाराजांच्या उजव्या बाजूस कांहीं लांकडी सामान पडलें असून, डाव्या बाजूस त्यांचें कृष्णाजिन आहे. महाराजांच्या अंगावर फक्त एक धोतर असून, गळ्यांतील रुद्राक्षांच्या माळा दिसत आहेत. दूरदूरच्या गांवीं सोनगीर गांव सर्वतोमुखीं होण्यास श्रीगोविंद महाराजांचें या ठिकाणचें वास्तव्यच कारण झालें. महाराजांचा जन्मकाल, स्थल, जात, भाषा वगैरेबद्दल निश्चित माहिती फारशी नाहीं; परंतु एवढें सांगतां येईल कीं ते उत्तर हिंदुस्थानांतील राहणारे असून त्यांची भाषा हिंदुस्तानी असावी. ते फारसें बोलत नसत व जें कांहीं बोलत, तें कोणास समजत नसे. त्यांच्या एकंदर रहाणीवरून ते महान् साधु असावे असें सर्वांस वाटत असे. त्यांच्या अंगीं असलेल्या त्रिकालज्ञानाचा अनुभव हजारों लोकांस आला आहे; म्हणूनच त्यांचे शिष्य व भक्तगण त्या भागांत सर्वत्र पसरलेले आहेत. हे साधु पुरुष शके १८४० सालीं समाधिस्थ झाले. महाराजांची पुण्यतिथि श्रावण वद्य ११स होते; त्यावेळीं तेथें बराच भक्तसमूह जमतो. सोनगीर येथील श्रीगोविंद महाराज यांचें दर्शन घेतल्यानंतर आपणास आतां शिंदखेडें तालुक्यांतील मुडावद क्षेत्रीं जावयाचें आहे.



नं० ४१:—सोनगीरचे श्रीगोविंद महाराज.

# कपिलेश्वराचें देवालय–मुडावद.


मुडावद हें क्षेत्र शिंदखेडें तालुक्याच्या पूर्व सरहद्दीवर पांझरा व तापी यांच्या संगमावर आहे. संगमाच्या जवळच एका उंच टेंकडीवर चित्रांत दाखविलेलें श्रीकपिलेश्वराचें प्रसिद्ध देवालय आहे. चित्रांत खालच्या बाजूस मोठमोठे खडक दिसत आहेत. चित्राच्या उजव्या बाजूस देवालयासमोरील नंदीचें ठिकाण व डाव्या बाजूस मुख्य देवालयावरील शिखर दिसत आहे. देवालयाचें सर्व काम दगडी आहे. मुख्य देवालय प्राचीन असून शिखर, सभामंडप, दीपमाळ, धर्मशाळा वगैरे कामें श्रीअहिल्याबाई होळकरीण हिनें केलीं असें म्हणतात. शिखराचें काम फारच सुंदर आहे. सभोंवार बरीच झाडी आहे म्हणून हें स्थान फार रमणीय असून दोन नद्यांच्या संगमावर वसलें असल्यानें फार पवित्र समजलें जातें. या भागांतील यात्रेचें हें एक प्रसिद्ध ठिकाण आहे. येथें महाशिवरात्रीस मोठी यात्रा भरते. त्यावेळीं सभोंवतालच्या बऱ्याच भागांतून या ठिकाणीं पुष्कळ लोक जमतात, मोठा बाजार भरतो व हजारों रुपयांची देवघेव होते. हें यात्रेचें ठिकाण अमळनेर, शिंदखेडें व शिरपूर या तालुक्यांचे सरहद्दीवर असल्यानें यात्रेच्या वेळीं तिन्हीं तालुक्यांतील मुलकी व पोलीस अधिकारी बंदोबस्ताकरितां येथें येतात. देवालयाच्या खाली संगमावर असलेल्या नावेंत बसून नदीपार जाऊन, शिरपूर तालुक्यांतील थाळणेर गांवचा ऐतिहासिक किल्ला पहावयास आतां जावयाचें आहे.



नं० ४२:—कपिलेश्वराचें देवालय—मुडावद.

# संगमावराल नाव-मुडावद.


मुडावद येथील पांझरा व तापी यांच्या संगमाच्या प्रवाहांत उभी असलेली नाव चित्रांत दिसत आहे. नावेच्या पलीकडे नदीकांठीं शिरपूर तालुक्यांतील झाडी आहे. नावेवर दोन नावाडी व दोन उतारू दिसत आहेत. नाव बरीच मोठी असून उतारूंस बसण्याकरितां वर फळ्या घातल्या आहेत. नावेच्या दोन्हीं बाजूंस लांकडी कठडे असून, नावेच्या मागील बाजूस सुकाणूं आहे. नावेस डोलकाठी असून जवळच नाव चालविण्याचीं वल्हीं व बांबू खालीं पडलेले दिसत आहेत. वारा असला म्हणजे डोलकाठीस शीड लावितात व वारा नसल्यास वल्ह्यांनीं नाव चालवितात. पावसाळ्यांत तापीस मोठा पूर येतो व सुमारें चार महिने पाय उतार बंद होतो. त्यावेळीं नावेशिवाय पैलतीरास जातां येत नाहीं. या जिल्ह्यांत तापी नदीला असे नावेचे मोठे उतार पूर्वेकडून पश्चिमेकडे जातांना मुडावद, सावळदें, सारंगखेडें, प्रकाशें, तळोदें व कुकुरमुंडें या ठिकाणीं आहेत. येथें नावेंतून मोठमोठ्या भरलेल्या बैलगाड्या जनावरांसह परतीरास नेतात. पावसाळ्यांत उताराच्या ठिकाणीं नाव चालविण्याकरितां मक्तेदार लोक सरकाराकडून परवाने घेतात व उतारूंकडून येण्याजाण्याचा नोर [ फी ] वसूल करतात. नावेची तपासणी सरकारी इंजिनिअर खात्याकडून दरसाल होते, म्हणून सहसा अपघात होत नाहींत. संगमावरील नावेंत बसून पैलतीरास उतरून नदी कांठाकांठानें सुमारें दोन मैल गेल्यावर नदीकांठींच थाळणेरचा किल्ला लागतो. तो आतां आपण पाहूं.



नं० ४३:—संगमावरील नाव—मुडावद.

# थाळणेरचा किल्ला.


थाळणेर गांवाच्या दक्षिणेस तापी नदीच्या कांठीं असलेला थाळणेरचा किल्ला चित्रांत दाखविला आहे. चित्राच्या पुढील भागीं नदीचें वाळवंट असून मध्यभागीं किल्ल्याचें पडून गेलेलें बांधकाम दिसत आहे. चित्राच्या वरच्या बाजूस किल्ल्याचे दोन बुरूज चांगल्या स्थितींत असलेले दिसत आहेत. किल्ल्यास एकंदर सहा बुरूज व सात दरवाजे होते असें म्हणतात. त्यांपैकीं दोन बुरूज व एक दोन पडके दरवाजे मात्र आतां शिल्लक राहिले आहेत. किल्ल्याच्या सभोंवार विटांनीं बांधलेला भक्कम कोट होता, तो आतां बहुतेक पडून गेला आहे. चवदाव्या शतकांत यादव वंशांतील गवळी राजांनीं हा किल्ला बांधिला असें म्हणतात. पुढें तो मुसलमानांच्या ताब्यांत आला. खानदेशचा सर्व भाग मलिकराजा फारुकी याला जेव्हां मिळाला, त्यावेळीं त्यानें थाळणेर हीच आपली राजधानी केली होती. मलिकचा मुलगा नसिर हा खानदेशांत राज्य करीत असतांना गुजराथचा बादशहा पहिला अहमद यानें या किल्ल्यास इ०स० १४२३ सालीं वेढा दिला. पुढें महंमद बेगडा [१४९९], चेंगीसखान [ १५६६ ] व अकबर [ १६०० ] यांनीं अनुक्रमें या किल्ल्यावर हल्ले केले. मुसलमानी अमदानी नंतर हा किल्ला मराठे, पेशवे व होळकर यांच्या अमलाखालीं आला व इ० स० १८१८ सालीं सर थॉमस हिस्लॉप यानें होळकरांच्या किल्लेदाराबरोबर लढाई करून हा किल्ला सर केला. या लढाईंत दोन युरोपियन अंमलदार मारले गेले. त्यांचीं दोन थडगीं किल्ल्याच्या मध्यभागीं आहेत; त्यांची दुरुस्ती सरकारांतून होत असते.



नं० ४४:—थाळणेरचा—किल्ला.

# थाळणेरचे हजिरे.


थाळणेर गांवाच्या वायव्य कोपऱ्यास असलेल्या हजिरे नांवाच्या मुसलमान लोकांच्या फार जुन्या इमारती या चित्रांत दाखविल्या आहेत. त्यांतील कांहीं मशिदीच्या आकाराच्या, कांहीं देवळासारख्या व कांहीं अष्टपैलू आहेत. या इमारती मजबूत असून यांचें बांधकामही चांगलें आहे. फारुकी वंशांतील पहिल्या आठ बादशहांचीं हीं थडगीं आहेत असें म्हणतात. त्यांपैकीं सर्वांत मोठी मध्यभागीं असलेली इमारत फारुकी वंशांतील पहिला बादशहा मलिकराजा याची कबर होय. इतर इमारती त्याच्यानंतर गादीवर बसलेल्या बादशहांचीं थडगीं आहेत असें म्हणतात. इमारतीच्या वरच्या बाजूस वाटोळे घुमट दिसतात व पुढील बाजूस कमानी आहेत. या सर्व इमारती हल्लीं चांगल्या स्थितींत आहेत. परंतु त्यांवर योग्य देखरेख नसल्यामुळें इमारतींच्या आंतील व आसपासचा भाग अत्यंत शोचनीय स्थितींत आहे. या जुन्या ऐतिहासिक इमारती पुराणवस्तुसंशोधन खात्याच्या अमलाखालीं गेल्या असत्या तर त्यांची व्यवस्था चांगली राहिली असती. यांपैकीं एका इमारतीवर फारशी भाषेंत कोरलेला एक शिलालेख आहे. त्याची प्रत इतिहाससंशोधकमंडळाकडे गेली आहे असें म्हणतात. थाळणेर येथील किल्ला व हजिरे पाहिल्यानंतर तापी नदीच्याच तीरानें पश्चिम दिशेस बराच दूरचा म्हणजे सुमारें ५० मैलांचा प्रवास करून शहादें तालुक्यांतील प्रकाशें नांवाच्या प्रसिद्ध क्षेत्राला आतां जावयाचें आहे.



नं० ४५ :—थाळणेरचे हजिरे.

# केदारेश्वराचें देवालय–प्रकाशें.


शहादें तालुक्यांत तापी नदीच्या उत्तर तीरावर ‘ प्रकाशें ’ नांवाचें अति प्रसिद्ध क्षेत्र आहे. हें तापी व गोमती या नद्यांच्या संगमावर असल्याकारणानें फार पवित्र समजलें जातें. याला ‘ खानदेशाची काशी ’ म्हणतात. सिंहस्थांत या क्षेत्रीं मोठी यात्रा भरते. येथें स्नान व श्राद्धविधि केल्यानें पुनर्जन्म येत नाहीं अशी भाविकांची समजूत आहे. या क्षेत्रांत बरींच देवालयें आहेत; त्यांपैकीं सर्वांत मोठें असें केदारेश्वराचें देवालय या चित्रांत दाखविलें आहे. याचें सर्व काम दगडी असून फार मजबूत आहे. देवालयाच्या पुढील भागीं विस्तीर्ण दगडी फरशी असून, तेथें दोन भक्त उभे असलेले चित्रांत दिसत आहेत. देवळांत वर जाण्यास बऱ्याच दगडी पायऱ्या असून, देवालयाच्यापुढें भव्य सभामंडप आहे. सभामंडपाच्या तिन्ही बाजूंस सुंदर कमानी असून आंतील बाजूस गाभारा आहे. गाभाऱ्यांत स्वयंभू शंकराचें स्थान असून, त्या ठिकाणीं बरेच नंदादीप अहर्निश तेवत असतात. दूरदूरच्या भागांतून अनेक भक्त येथें येऊन रुद्राभिषेक करवितात व कित्येक श्रीमंत लोकांनीं या देवालयास वर्षासनें करून दिलीं आहेत. देवालयाचा आंतील भाग जुना असून पुढील सभामंडपाचें काम श्रीअहिल्याबाई होळकरीण हिनें करविलें असें म्हणतात. तोरखेडें येथील प्रसिद्ध जहागिरदार कदमबांडे यांच्या घराण्यांतील सकुवार बाईनें या देवालयाचा आंतील मुख्य भाग शके १६६४ मध्यें बांधला, असा देवालयाच्या मुख्य दरवाजावर शिलालेख आहे. येथें त्रिपुरी पौर्णिमेस मोठी यात्रा भरते, व रात्रीं मोठा दीपोत्सव होतो. या प्रकाशें क्षेत्रांत गौतमेश्वर, सिद्धेश्वर, श्रीलक्ष्मी यांचींही मोठीं देवालयें आहेत.



नं० ४६:—केदारेश्वराचें देवालय—प्रकाशें.

# किल्ल्याचा दरवाजा–तळोदें.


शहादें तालुक्यांतील प्रकाशें क्षेत्राहून निघून वायव्य दिशेस सुमारें दहा मैल गेल्यावर तळोदें नांवाचें तालुक्याचें ठिकाण लागतें. येथें बारगळ नांवाचें इतिहासप्रसिद्ध जहागिरदाराचें घराणें आहे. यांनीं पूर्वीं मुसलमानी अमदानींत बरीच मर्दुमकी गाजवून तळोदें गांवची जहागिरी मिळविली म्हणतात. या शिवाय यांच्याकडे दलेलपूर, रोझें व भवर या गांवची जहागिरी आहे. इतिहासप्रसिद्ध श्रीअहिल्याबाई होळकरीण हिची सासू या बारगळ घराण्यांतीलच होती. तळोदें गांवाच्या दक्षिणेस या बारगळांचा वाडा व किल्ला आहे. हा वाडा पूर्वीं किल्ल्याच्या आंत होता. किल्ल्याच्या तटाचे भाग हल्लीं सर्व पडलेले असून किल्ल्याचा मुख्य दरवाजा मात्र अद्याप शाबूत आहे. याच दरवाजाचें चित्र या ठिकाणीं दाखविलें आहे. चित्राच्या मध्यभागीं मुख्य दरवाजा असून दरवाजाच्या वरच्या बाजूस तीन कमानी दिसतात. दरवाजाचें काम बरेंच मजबूत दिसतें. या दरवाजाची उंची अडीच तीन पुरुष असून दाराची जाडीही बरीच आहे. दारावर लोखंडी पत्रा असून त्यावर मोठे, मजबूत लंगरी खिळे बसविले आहेत. दरवाजावरील कमानींच्या भागांत जाण्यास दगडी जिने असून वर दोन तीन भव्य दालनेंही आहेत. दालनांच्या वरच्या बाजूस गच्ची असून तेथून सभोंवतालचा तापी कांठचा व सातपुड्या-वरील देखावा सुंदर दिसतो. दरवाजाच्या आंतील बाजूस मोठें पटांगण असून ह्या पटांगणाच्या पश्चिमेस श्रीमंत बारगळांचा राहण्याचा वाडा आहे. तो पुढें आपणास दिसेल.



नं० ४७ :—किल्ल्याचा दरवाजा—तळोदें.

# बारगळांचा वाडा–तळोदें.

तळोदें येथील प्रसिद्ध जहागिरदार श्रीमंत बारगळ यांचा राहण्याचा वाडा चित्रांत दाखविला आहे. वाड्याच्या समोर मोठें पटांगण असून त्यांत एका जुन्या पडक्या भिंतीचा भाग चित्राच्या खालील बाजूस दिसत आहे. हा वाडा तिमजली आहे व त्याचें बांधकामही मजबूत व सुंदर आहे. पटांगणांतून वाड्यांत जाणारे दोन गृहस्थ चित्रांत दिसत आहेत. वाड्याच्या आंतील बाजूस दोन मोठे चौक आहेत व त्यांच्या मध्यभागीं कारंजीं आहेत. वाड्याच्या दुसऱ्या मजल्याचा बाहेरील भाग सुंदर असून त्यावर कोरींव काम केलें आहे. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर मोठमोठे दिवाणखाने आहेत व त्यांत दरबारी सामानसुमानही बरेंच आहे. वाड्याचें वरचें छप्पर बरेंच जीर्ण झालें असून कांहीं ठिकाणीं हल्लीं पत्रा बसविला आहे. वाड्याच्या दक्षिण बाजूस मोठी विहीर आहे व तेथें जवळच एक टुमदार बाग केली आहे. ह्या वाड्याचे हल्लींचे मालक श्रीमंत कृष्णराव ऊर्फ बाळा-साहेब बारगळ हे विद्वान व मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा सरकारदरबारीं मोठा मान असून ते शिक्षण विषयक कामांत बराच पुढाकार घेतात. तळोद्यासारख्या मागसलेल्या तालुक्यांतील लोकांस सुशिक्षित करून सुधारण्याकरितां यांनीं बरेच प्रयत्न केले आहेत. तळोद्याच्या उत्तरेस सुमारें आठ मैलांवर सातपुडा पर्वताची पहिली रांग लागते. ही रांग चढून पुढें १६ मैल गेल्यावर धडगांव नांवाचें पेठ्याचें ठिकाण लागतें. तें पाहाण्यास आपण आतां जाऊं.



नं० ४८ :—बारगळांचा वाडा—तळोदें.

# सातपुडा पर्वतांतील प्रवासी.

सातपुड्यांत भिल्ल लोकांची वस्ती फार आहे. त्या लोकांना शिक्षण देण्याकरितां धडगांव व कमोद या दोन गांवीं सरकारी शाळा आहेत. धडगांवास जातांना प्रथम तळोद्याहून कोठारपर्यंत जावें लागतें. तळोद्याहून कोठार आठ मैल आहे. तेथपर्यंत बैलगाड्या जातात. कोठारपासून सातपुड्याच्या पहिल्या रांगेच्या चढावास आरंभ होतो. चांदसेली खिंडींतून ही रांग चढून जातांना सहा मैलांत १८०० फूट चढ चढावा लागतो. या खिंडींतून जातांना कितीही सशक्त मनुष्य असला तरी तो थकून जातो व अशक्त प्रवाशास डोली करून त्यांत बसून जावें लागतें. प्रवाशास दोन घोडींही भाड्यानें मिळतात. व तीं घेऊन प्रवास करितां येतो. हीं घोडीं अशक्त दिसतात पण तीं फार काटक असतात. कांहीं वेळ एका घोड्यावर बसावें नंतर त्यास विसावा देऊन दुसऱ्या घोड्यावर बसावें, याप्रमाणें हा सहा मैलांचा चढाव मोठ्या कष्टानें चढावा लागतो. तेथें चांदसेलीचा घाट संपतो. पुढें सोळा मैल साधारण सपाट प्रदेशांतून गेल्यावर धडगांव लागतें. अशा कष्टानें धडगांवास जाणारे एक शाळाधिकारी या चित्रांत दाखविले आहेत. चार भिल्लांच्या डोक्यावर एक उलटी बाज ठेवून त्यावर हे शाळाधिकारी बसून चालले आहेत. त्यांचे शिपाई व बिगारी बरोबर चालले असून, एक शाळामास्तरही घोड्यावरून जात आहेत असें या चित्रावरून दिसून येईल.



नं० ४९ :—सातपुडा पर्वतांतील प्रवासी.

# धडगांव येथील शाळेचा बक्षिससमारंभ.

इंग्रज सरकारच्या राज्यापासून हिंदुस्थानांतील प्रजेस जे कांहीं फायदे होत आहेत, त्यांत सार्वजनिक विद्यादान हा एक प्रमुख फायदा आहे. पश्चिम खानदेशांत लोकसंख्येच्या मानानें शिक्षणाचें प्रमाण कमी आहे. त्यांत मागसलेल्या जातींत तर फारच कमी. नंदुरबार, नवापूर व तळोदें या तालुक्यांत भिल्ल लोकांची वस्ती फार आहे. या भिल्ल लोकांना शिक्षण देऊन त्यांची उन्नति करावी म्हणून मिशनरी लोकांनीं व सरकारनें बऱ्याच शाळांतून या लोकांकरितां मोफत शिक्षण सुरू केलें आहे. नंदुरबार व कुकुरमुंडें या दोन गांवीं विद्यार्थिवसति-गृहें स्थापून, भिल्ल मुलांस शिष्यवृत्त्या देऊन त्यांच्या शिक्षणाची सोय केली आहे. धडगांव व कमोद येथील शाळांतील भिल्लांच्या मुलांस वार्षिक परीक्षेच्या वेळीं कपडे, टोप्या बक्षिस देऊन, शिवाय वार्षिक हजिरीच्या मानानें रोख पैसेही बक्षिस देतात. धडगांव येथील १९१६ च्या बक्षिस समारंभाचें हें चित्र आहे. शाळेची परीक्षा घेऊन बक्षिसें वांटण्याकरितां आलेले शाळाधिकारी चित्राच्या मध्यभागीं खुर्चीवर बसलेले दिसत आहेत. त्यांच्या समोर मेजावर बक्षिस देण्याकरितां आणलेले सदरे, धोतरें, टोप्या वगैरे कपडे ठेवलेले आहेत. बक्षिसें घेण्या-करितां फार आतूर झालेला शिष्यगण चित्राच्या उजव्या बाजूस जमिनीवर बसलेला दिसत आहे. चित्राच्या डाव्या बाजूस बक्षिस समारंभाकरितां आलेले गांवांतील सभ्य गृहस्थ खुर्चीवर बसले आहेत. चित्राच्या मागच्या बाजूस शाळागृह असून शाळेसमोरील पटांगणांत बक्षिससमारंभ सुरू आहे. हा बक्षिससमारंभ आटोपून आपण धडगांवचा जुना ऐतिहासिक किल्ला पहावयास जाऊं.



नं० ५० :—धडगांव येथील शाळेचा बाक्षिससमारंभ.

# धडगांवचा किल्ला.


धडगांव येथील किल्ल्याचें हें चित्र आहे. धडगांव हें ठिकाण सातपुडा पर्वतांतील दुसऱ्या रांगेच्या पठारावर वसलें आहे. या ठिकाणीं सभोंवार जंगल असून बहुतेक वस्ती भिल्ल लोकांची आहे. पूर्वींच्या धामधुमीच्या काळीं या प्रदेशांत दंगेधोपे बरेच होत असत, म्हणून उत्तरेकडून आलेल्या रजपूत लोकांनीं हा किल्ला स्वतःच्या संरक्षणाकरितां बांधला असावा असें म्हणतात. किल्ल्याचें काम बहुतेक विटांचें असून किल्ल्याची उंचीही फारशी नाहीं. किल्ल्याच्या चार बुरुजांपैकीं एक बुरूज चित्रांत डाव्या बाजूस दिसत आहे. किल्ल्याचे सर्व भाग अद्याप शाबूत असून कित्येक ठिकाणीं अलीकडे दुरुस्तीही केली आहे. किल्ल्याचा मुख्य दरवाजा चित्राच्या उजव्या बाजूस दिसत आहे. दरवाजावर अलीकडे बांधलेला एक मजला दिसत आहे. तेथें किल्ल्यावरील पहारेकरी रहातो. तो आपल्या कुटुंबासह चित्राच्या मध्यभागीं उभा आहे. किल्ल्याचा आंतील भाग फारसा विस्तृत नसून हल्लीं त्या ठिकाणीं धडगांव पेट्याच्या महालकरी साहेबांची कचेरी असते. हा किल्ला पूर्वी रजपुतांच्या ताब्यांत होता. या रजपूत लोकांना आपल्या अमलाखालीं आणण्याकरितां मोंगलांनीं बरेच यत्न केले. पण त्यांत त्यांना फारसें यश आलें नाहीं. खानदेश इंग्रजांच्या ताब्यांत आल्यानंतर सातपुड्यांतील भिल्ल व रजपूत लोकांना वश करण्याचे बरेच प्रयत्न औट्रम साहेबांनीं केले; त्यावेळीं येथील किल्लेदारास बरीच रक्कम देऊन हा किल्ला इंग्रजांनीं घेतला असें म्हणतात. धडगांवच्या उत्तरेकडे पश्चिम खानदेश जिल्ह्याच्या सरहद्दीवर असणाऱ्या पवित्र नर्मदा नदीचें दर्शन घेण्याकरितां आतां जावयाचें आहे.



न० ५१ :—धडगांवचा किल्ला.

# धडगांव पासून नर्मदेपर्यंतचा प्रदेश.

सातपुडा पर्वताच्या दुसऱ्या रांगेच्या पठारावर समुद्र सपाटी पासून सुमारें १२०० फूट उंच असलेलें धडगांव नांवाचें पेठ्याचें ठिकाण नकाशाच्या मध्यभागीं दिसत आहे. धडगांवाहून ईशान्य दिशेस उदाई नदीच्या कांठानें चार मैल गेल्यावर सातपुड्याच्या तिसऱ्या रांगेवर चढावें लागतें. या रांगेत सहा मैलांचा प्रदेश बराच चढावाचा आहे. ही रांग उतरून पांच मैल पुढें गेल्यावर उदाई व नर्मदा यांच्या संगमा जवळील सपाट प्रदेश लागतो. उदाई नदीच्या मुखाजवळील भुशा नांवाचें ठिकाण नकाशांत दिसत आहे. या भुशा गांवीं सातपुड्याच्या जंगलांतून तोडून आणलेल्या इमारती लाकडांची मोठी वखार आहे. गुजराथेंतील बरेच व्यापारी या गांवीं येऊन सागाचे मोठमोठे कूप खरेदी करून तोडलेलें लांकूड नर्मदानदींतून तराफ्यानें भडोचकडे नेत असतात. भुशागांवीं नावेंत बसून नर्मदेच्या पात्रांतून पश्चिमेकडे सुमारें बारा मैल जलप्रवास केल्यानंतर डोमखडी गांवाजवळ खाट व नर्मदा नदी यांचा संगम दिसतो. पुढें सुमारें तीन मैल गेल्यावर छोटा उदेपूर संस्थानांतील हापेश्वर नांवाचें क्षेत्र नर्मदेच्या उत्तर तीरावर दिसतें. हें क्षेत्र बाणगंगा व नर्मदा यांच्या संगमावर असल्यामुळें फार पवित्र समजलें जातें. हापेश्वराहून परत धडगांवास जातांना डोमखडीच्या दक्षिणेस पांच मैलांच्या प्रवासांत ८०० फूट चढण चढावी लागते; नंतर दक्षिणेस सातपुड्याची तिसरी रांग चढावी लागते. या रांगेंत सुमारें तीन मैलांच्या प्रदेशांत १००० फूट चढण आहे. पुढें दक्षिणेस देवनंदा व खाट नदींच्या संगमावरून चार मैल गेल्यावर धडगांवास परत जातां येतें.




नं० ५२ :—धडगांव पासून नर्मदेपर्यंतच्या प्रदेशाचा नकाशा.

# नर्मदेंतील जलप्रवास.


धडगांवच्या ईशान्येस पंधरा मैलांवर भुशा नांवाचें गांव आहे. ह्या गांवीं सागवानी लांकडाचा व्यापार बराच चालतो. गुजराथेंतून येणारे व्यापारी लोक या गांवाजवळ असलेल्या नर्मदा नदींतून नेहमीं सफरी करीत असतात. या व्यापारी लोकांचीच नदींतून जाणारी एक नाव या चित्रांत दाखविली आहे. नावेच्या मध्यभागीं डोलकाठी व शीड दिसत आहे. नावाडी हातांत बांबूच्या लांब काठ्या घेऊन नाव नदीकिनाऱ्यापासून खोल पाण्यांत नेत आहेत. नावेच्या मध्यभागीं व्यापारी लोक उभे आहेत. सातपुडा पर्वताच्या तिसऱ्या व चवथ्या रांगांच्या मधून नर्मदा नदी वहाते. चित्रांत उजव्या बाजूला तिसऱ्या रांगेची उतरण नदीकांठाला मिळालेली दिसत असून डाव्या बाजूला चौथ्या रांगेची उंच चढण दिसत आहे. या दोन रांगांच्या मधून येणारा नदी-प्रवाह नावेच्या मागच्या बाजूस दिसत आहे. हा प्रवाह पर्वताच्या दोन उंच रांगांमधील खडकाळ प्रदेशांतून वहात असल्यामुळें प्रवाहाला फारच जोर असून पात्रांतील खडकामुळें प्रवाहांतून जाणें बरेंच धोक्याचें आहे; परंतु नावाडी कुशल असल्यामुळें ते प्रवाहाच्या मोठमोठ्या धारांतून सुद्धां नाव सहज घेऊन जातात. या प्रवाहांतून प्रवास करीत असतांना चोंहों बाजूला सृष्टिसौंदर्य अप्रतिम दिसतें. दोहों बाजूला सातपुड्याच्या रांगेवरील अति दाट जंगल आणि त्यांतील उंच व भव्य सागाचे वृक्ष व रांगेच्या उतारावर असलेले निरनिराळे मळे पाहून मन फार सुप्रसन्न होतें. भुशाहून पश्चिमेकडे सोळा मैलांच्या जलप्रवासांत नर्मदा नदीला दक्षिणेकडून मिळणाऱ्या उदाई व खाट, व उत्तरेकडून येणारी बाणगंगा या नद्यांचे संगम लागतात. बाणगंगेच्या मुखाजवळ हापेश्वर नांवाचें क्षेत्र आहे. संगमांत स्नान करून देवदर्शन घेऊन आग्नेयी दिशेस खाट नदीच्या कांठानें सुमारें पंधरा मैल गेल्यानंतर धडगांवास परत जातां येतें व धडगांवाहून निघून चानसेली खिंडींतून परत तळोद्यास जातां येतें.



नं० ५३ :—नर्मदेंतील जलप्रवास.

# किल्ला—कुकुरमुंडे.


तळोद्याच्या पश्चिमेस सुमारें आठ मैलांवर तापी नदीच्या उत्तर तीरावर कुकुरमुंडें नांवाचें एक पुरातन क्षेत्र आहे. हें स्थान ऐतिहासिक व धार्मिक दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे. मोंगलांनीं खानदेश जिंकल्यावर पश्चिम सरहद्दीवरील हें त्यांचें फौजेचें मुख्य ठाणें होतें. पुढें इंग्रजी अमदानींतही सातपुड्यांतील भिल्ल लोकांना वश करण्याकरितां या ठिकाणीं इंग्रजांची फौज कांहीं काळपर्यंत होती. पूर्वींच्या धामधुमीच्या काळीं गांवाच्या बचावाकरितां सभोंवार तट बांधलेला होता व मध्यभागीं एक मजबूत किल्लाही होता. या किल्ल्याचा देखावा या चित्रांत दाखविला आहे. याचें बांधकाम बहुतेक विटांचेंच केलें असून हल्लीं तें बहुतेक जीर्ण झालेलें आहे. बुरुजावर चढण्याकरितां पायऱ्या केलेल्या असून त्या चढून वर गेलेला एक मनुष्य चित्रांत दिसत आहे. बुरुजाच्या वरच्या बाजूस एक कमान असून कमानीच्या आंत देवीची स्थापना केलेली आहे. या भागांत हें स्थान प्रसिद्ध असून येथें मोठी यात्राही भरत असते. कुकुरमुंडें ऐतिहासिक दृष्टीनें तसेंच धार्मिक दृष्टीनेंही फार प्रसिद्ध आहे. पूर्वीं द्वारकेकडे जाणाऱ्या यात्रेकरूंचें हें मार्गांतील मुख्य विश्रांतिस्थान असे. सिंहस्थांत गोसावी व बैरागी लोकांचे मोठमोठे मेळे या ठिकाणीं येत असत. तसेंच वैष्णव मताच्या व स्मार्त मताच्या लोकांचे या ठिकाणीं धार्मिक वाद होत असत. वैष्णव मताचे पुरस्कर्ते समाधिस्थ खंडोजी महाराजांचे शिष्य संतोजी महाराज, यांचें वास्तव्य हल्लीं या क्षेत्रांत असून ते लोकांस मोठ्या आस्थेनें भक्तिमार्गाचा उपदेश करीत असतात. कुकुरमुंड्याहून तळोदें मार्गानें आपणास आतां नंदुरबारला जावयाचें आहे.



नं० ५४:—किल्ला कुकुरमुंडे.

# तापीउतार-तळोदें.


तळोद्याहून नंदुरबारला जावयाचें म्हणजे तळोद्याच्या दक्षिणेस सुमारें १ मैलावर असलेली तापी नदी उतरून जावें लागतें. या तळोद्याच्या तापीउताराचा देखावा चित्रांत दाखविला आहे. चित्राच्या मध्यभागीं तापी नदीचें पात्र आहे. नदीच्या पलीकडे एक उंच टेंकडी असून, टेंकडीच्या टोंकावर दोन देवालयें आहेत. देवालयाच्या जवळूनच रस्त्यावरून एक गाडी येत असलेली चित्रांत दिसत आहे. त्याचप्रमाणें मालानें भरलेल्या अनेक गाड्यांची व मनुष्यांची नदीतीरावर गर्दी झालेली दिसते. कांहीं गाड्या नदीपार होण्याकरितां, नदीच्या पात्रांतून चाललेल्या आहेत. या जिल्ह्यांत तापी नदीस जे चार पांच मोठे उतार आहेत, त्या सर्वांत हा तळोद्याचा उतार फार सोईचा आहे; कारण नदीच्या उत्तर तीरावर चांगला दगडी धक्का बांधलेला आहे, त्यामुळें नाव नेहमीं धक्क्यास लावून उतारू, गाड्या, घोडीं, बैल व माल चढविण्यास आणि उतरण्यास फार सोईचें झालें आहे. हा तापीउतार सातपुड्यापासून जवळच असल्यानें सातपुड्याच्या जंगलांत होणारें सागवानी लांकूड, मोहाचीं फुलें, कात, डिंक, मध, मेण, रोशेल हे जंगली जिन्नस व एरंडी वगैरे माल गाड्यांत भरून याच उताराच्या मार्गानें नंदुरबारच्या रेलवे स्टेशनाकडे रवाना होतो. मालानें भरलेल्या गाड्या जात असलेल्या या चित्रांत दिसत आहेत. या गाड्या हांकण्याचें काम बहुतेक भिल्ल लोक करतात व या कामांत ते तरबेज असतात. नदी उतरून पक्क्या सडकेनें आपण आतां नंदुरबारला जाऊं.



नं० ५५ :—तापी उतार—तळोदें.

# नंदुरबार येथील दर्गा.


तळोद्याच्या दक्षिणेस तापी उतरून सुमारें १३।१४ मैल सडकेनें गेल्यावर नंदुरबार हें तालुक्याचें ठिकाण लागतें. हें शहर पूर्वीं फार भरभराटीचें असून इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचें होतें. मोंगलांच्या अमदानींत हें एक सुभ्याचें ठाणें असून त्यावेळचे तें लष्करी ठिकाणही होतें. यादव वंशांतील गवळी राजांच्या कारकीर्दींत नंदागवळी नांवाचा हिंदु राजा या ठिकाणीं राज्य करीत असे. तो मुसलमांनाशीं लढत असतां या ठिकाणीं मारला गेला असें म्हणतात. त्याचप्रमाणें शेख सादत नांवाच्या मुसलमान अवलियाचें याच लढाईंत शीर तुटून रण-भूमीवर पडलें, परंतु अवलियाच्या धडानेंच लढाई करून हिंदू सैन्याचा पराभव केला अशी दंतकथा सांगतात. सदरहू अवलियाचें शीर नंदुरबारच्या नैर्ऋत्येस असणाऱ्या टेंकडीवर नेऊन पुरलें व त्या ठिकाणीं दर्गा बांधला. दर्ग्यांत जाण्याचा मुख्य दरवाजा या चित्रांत दाखविला आहे. सुमारें पाव मैल चढून गेल्यानंतर हा दरवाजा लागतो. दरवाजाच्या आंतल्या बाजूस पिराचें मुख्य स्थान आहे. हे शेख सादत अवलिया मूळचे अरबस्थानांतील रहाणारे असून, अजमीर येथील ख्वाजे मायुद्दीन चिस्ती या अवलियाचे हुकुमानें नंदुरबार येथील हिंदू राजा-बरोबर लढाई करण्यास आले असें म्हणतात. मोहरमच्या बाराव्या तारखेस या पिराचा मोठा उरूस भरतो व भाविक लोक पिरास नवस वगैरे करतात. दर गुरुवारीं पिराच्या दर्शनास लोक जमतात. हें पिराचें स्थान पाहून रेलवे रस्त्यानें आपण नवापुरास जाऊं.



नं० ५६ :—नंदुरबार येथील—दर्गा.

# नवापूरच्या किल्ल्याचा दरवाजा.


नंदुरबारच्या पश्चिमेस ३८ मैलांवर नवापूर नांवाचें तालुक्याचें ठिकाण आहे. हें तापी व्हॅली रेलवेचें स्टेशन असल्यामुळें व्यापाराच्या दृष्टीनें त्याला फार महत्व आलें आहे. सह्याद्रीच्या व सातपुड्याच्या जंगलांतील पुष्कळ लांकूड या ठिकाणीं येऊन परप्रांतीं रवाना होतें; म्हणून लांकडाच्या व्यापाराची या जिल्ह्यांतील ही एक महत्वाची पेठ आहे. गांवाच्या उत्तरेस येथील जुना किल्ला आहे. किल्ल्याचा तट व दरवाजे यांचे बहुतेक भाग अद्याप शाबूत आहेत. या किल्ल्याला पूर्वेकडे व पश्चिमेकडे असे दोन दरवाजे आहेत. हे दोन्ही दरवाजे चित्रांत दिसत आहेत. पुढच्या बाजूस मोठा दिसत असलेला दरवाजा हा पश्चिमेकडील होय. तटाचें व दरवाजाचें बहुतेक काम विटांचेंच केलेलें आहे. शत्रूचा वेढा पडला असतां गोळ्या मारण्याकरितां तटाला तिरपीं भोकें ठेविलेलीं आहेत. दरवाजाच्या आंतील बाजूस विस्तृत जागा असून सभोंवार सैनिकांच्या राहण्याच्या दुमजली खोल्या आहेत. पूर्वीच्या काळीं नवापूर हें महत्वाचें छावणीचें ठिकाण होतें. अकबर बादशहाचा मुलगा दानियाल यानें इ०स० १५९९ सालीं खानदेशावर स्वारी केली, त्यावेळीं त्याची छावणी या किल्ल्यांत कांहीं दिवस होती. दानियालनें पुढें खानदेश काबीज केला, तेव्हां त्याचें स्मारक म्हणून अकबर बादशहा खानदेशाला 'डानदेश' म्हणत असे, अशी आख्यायिका आहे. नवापुरचा किल्ला पाहून बराच लांबचा प्रवास करून कोंडाईबारीच्या रस्त्यानें साकरी तालुक्यांत पिंपळनेरला आतां जाऊं.



नं० ५७ :—नवापूरच्या किल्ल्याचा दरवाजा.

# रत्नाकर स्वामींची समाधी–पानखेड.


साकरी तालुक्यांत पिंपळनेरच्या पश्चिमेस सुमारें पांच मैलांवर पानखेड नावाचें एक लहानसें गांव आहे. या गांवाच्या पश्चिम दिशेस रत्नाकर स्वामींची समाधि आहे. ह्या समाधीचा देखावा या चित्रांत दाखविला आहे. संन्याशी वारल्यावर त्यास पुरून त्यावर जो चिरेबंदी उंच ओटा बांधितात, त्यास समाधि असें म्हणतात. समाधीवर लहानसें कौलारू छप्पर असलेलें या चित्रांत वरच्या बाजूस दिसत आहे. छपराला सभोंवतीं मोठमोठे खांब दिले असून मध्यभागीं समाधि दिसत आहे. येथें आश्विन वद्य १३ स रत्नाकर स्वामींच्या पुण्यतिथीचा मोठा उत्सव होतो. या वेळीं आसपासच्या भागांतून त्यांच्या शिष्यपरंपरेंतील अनेक भाविक लोक येथें जमतात. रत्नाकर स्वामी हे मैत्रायणी शाखेचे ब्राह्मण होते. हे मोठे विद्वान्, संस्कृतज्ञ व वेदांतग्रंथकर्ते असे होऊन गेले. त्यांनीं संस्कृत भाषेंत बरेच ग्रंथ लिहिले आहेत. त्यांपैकीं मुख्य ग्रंथ 'दीपरत्नाकर' हा होय. आसपासच्या भागांत त्यांचा शिष्यसंप्रदाय बराच असून समाधीच्या दर्शनाकरितां बरेच लोक येत असतात. हें स्थान पांझरा नदीच्या कांठीं दाट झाडींत असल्यानें शांत व रमणीय असें आहे. ही पानखेडची समाधि पाहून पूर्व दिशेकडे प्रवास करून साकरी तालुक्याच्या उत्तर भागीं निजामपूर गांवानजीक असलेलीं बलसाणें गांवचीं जुनीं हेमाड-पंती देवालयें पहावयास आपण जाऊं.



नं० ५८ :—रत्नाकर स्वामींची समाधि—पानखेड.

# बलसाण्याचें देवालय.


साकरी तालुक्यांत निजामपूरच्या ईशान्येस सुमारें दहा मैलांवर बलसाणें नांवाच्या गांवांत फार जुनीं देवालयें आहेत; त्यांपैकीं गांवाच्या बाहेर नाल्याच्या पलीकडे शेतांत असलेल्या एका देवालयाचें चित्र येथें दाखविलें आहे. हें देवालय चवदाव्या शतकांत यादव वंशांतील रामदेव नांवाच्या राजाच्या कारकीर्दींत त्याचा प्रधान हेमाद्रि यानें बांधिलें, म्हणून यास हेमाडपंती देवालय असें म्हणतात. या चित्रांतील देवालयाचें सर्व काम दगडी असून फार मजबूत आहे. देवालयाच्या पुढील भागीं चारी बाजूंस चार खांब देऊन त्यावर उंच दगड बसविले आहेत. येथून देवळांत जाण्याचा रस्ता आहे. या देवळाचे एकंदर तीन भाग आहेत. पुढील दरवाजाचा भाग, सभामंडप व आंतील गाभारा. सभामंडप औरसचौरस अठरा फूट असून त्याचे खांब १० फूट उंचीचे आहेत. देवालयाच्या आंतील व बाहेरील खांबांवर हात जोडलेल्या निरनिराळ्या मूर्ति कोरलेल्या आहेत. देवालयाच्या दगडी छतावरही आंतील बाजूस निरनिराळे पौराणिक देखावे कुशलतेनें कोरले आहेत. हीं देवालयें या देशांतील पूर्वकालच्या कलाकौशल्याच्या निपुणतेची साक्ष देत आहेत. देवालयें बांधून बराच काळ लोटला तरी तीं अद्याप चांगल्या स्थितींत आहेत. यावरून त्यावेळचें बांधकाम किती मजबूत होतें हें दिसून येईल. हें देवालय पाहून साकरी रस्त्यानें धुळ्यास आतां परत जाऊं. पश्चिम खानदेश जिल्ह्यांतील प्रवासास आपण धुळ्याहून आरंभ करून परत धुळ्यास आलों व जिल्ह्यांतील महत्त्वाचीं धार्मिक, ऐतिहासिक, सृष्टिसौंदर्यविषयक प्रेक्षणीय स्थळें पाहिलीं. पश्चिम खानदेश जिल्हा ज्या महाराष्ट्रप्रांताचा एक भाग आहे त्याच्याशीं या जिल्ह्याची आपण आतां तुलना करूं.



नं० ५९ :—बलसाण्याचें–देवालय.

# पश्चिम खानदेश व महाराष्ट्र यांची तुलना.

मुंबई इलाख्यांत महाराष्ट्र प्रांताच्या अगदीं उत्तरेस असलेला खानदेश जिल्हा या नकाशांत काळ्या रेषांनीं दाखविला आहे. याच्या पूर्वेकडील भागास पूर्व खानदेश व पश्चिमेकडील भागास पश्चिम खानदेश असें म्हणतात. हे दोन्ही जिल्हे नकाशांत निरानिराळे स्पष्ट दिसत आहेत. मुंबई इलाख्याच्या मध्यभागीं जाड काळ्या रेषांनीं दाखविलेला महाराष्ट्र प्रांत होय. क्षेत्रफळाच्या दृष्टीनें पश्चिम खानदेश जिल्हा हा महाराष्ट्राचा साधारणपणें आठवा हिस्सा आहे, हें नकाशावरून व नकाशाच्या डाव्या बाजूस दिलेल्या क्षेत्रफळाच्या चौरसांवरून लक्षांत येईल. या चौरसांपैकीं प्रत्येक लहान घर २००० चौरसमैल क्षेत्र दाखवितें. यावरून पश्चिम खानदेशाचें क्षेत्रफळ ५५२५ चौरस मैल असून महाराष्ट्राचें क्षेत्रफळ ४६९०१ चौरसमैल आहे असें दिसून येईल. नकाशांतील उजव्या बाजूवरील चौरसांवरून महाराष्ट्र व पश्चिम खानदेश यांतील लोकसंख्येची तुलनात्मक कल्पना येईल. या चौरसांतील प्रत्येक लहान घर पांच लक्ष लोकसंख्या दाखवितें. यावरून पश्चिम खानदेश जिल्ह्याची लोकसंख्या ६४१८४७ असून, महाराष्ट्राची लोकसंख्या ८५३६२१६ आहे असें दिसून येईल. म्हणून लोकसंख्येच्या दृष्टीनें पश्चिम खानदेश जिल्हा महाराष्ट्राचा १३ वा भाग साधारण मानानें होतो. नकाशावरून व नकाशाच्या दोन्हीं बाजूंच्या चौरसांवरून पश्चिम खानदेश जिल्हा व पूर्व खानदेश जिल्हा, महाराष्ट्र व मुंबई इलाखा यांच्या क्षेत्रफळांची व लोकसंख्येची परस्पर तुलनात्मक कल्पना होईल. याप्रमाणें महाराष्ट्राच्या एका भागाचें म्हणजे पश्चिम खानदेश जिल्ह्याचें भौगोलिक व ऐतिहासिक सचित्र वर्णन केल्यावर पश्चिम खानदेश जिल्हा ज्या महाराष्ट्रप्रांताचा एक लहानसा भाग आहे त्या महारष्ट्रप्रांताचें पुढील भागांत विस्तारानें सचित्र वर्णन करण्याचें योजिलें आहे.




नं० ६०:—पश्चिमखानदेश व महाराष्ट्र यांच्या तुलनेचा नकाशा.

# विक्रीस तयार

या पुस्तकांत दिलेल्या सर्व देखाव्यांचे स्टीरिओग्राफ्स् व लँटर्न स्लाइड्स् विक्रीकरितां तयार आहेत. त्या प्रमाणेंच पूर्व खानदेश, नासिक, ठाणें व रत्नागिरी या जिल्ह्यांतील भौगोलिक व ऐतिहासिक प्रसिद्ध स्थळांच्या देखाव्यांचे स्टीरिओग्राफ्स् व लँटर्न स्लाइड्स्ही विक्रीकरितां तयार आहेत. प्रत्येक स्टीरिओग्राफची व लँटर्न स्लाइडची किंमत अनुक्रमें एक रुपया व दोन रुपये आहे. पुस्तककर्त्याकडे मागणी करावी.